सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक -१९० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २८ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## आंतरराष्ट्रीय व्यापार दबावाखाली नव्हे, स्वेच्छेने

### सरसंघचालक मोहन भागवत यांचा आत्मनिर्भतेचा नारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नवी दिल्ली**

आंतरराष्ट्रीय व्यापारासारखे परराष्ट्र धोरण दबावाखाली राबवले जाऊ नये, त्यामागे स्वेच्छा आणि स्वहिताचा विचार असला पाहिजे. हेच खरे स्वदेशीपण आहे, असे मत मांडत सरसंघचालक मोहन भागवत यांनी बुधवारी आत्मनिर्भरतेचा नारा दिला.

दिल्लीतील विज्ञान भवनात 'संघाची १०० वर्षांचा प्रवास-नवे क्षितीज' या विषयावरील दुसरे व्याख्यान भागवत यांनी दिले. आत्मनिर्भरता हा देशाच्या विकासातील कळीचा टप्पा आहे. जे देशात उत्पादित होते ते बाहेरून कशाला आणायचे? देशी बनावटीच्या वस्तूंना प्राधान्य द्या. पण, आत्मनिर्भरता याचा अर्थ काहीच आयात करू नका असे नव्हे. ज्या वस्तू आपल्या देशात उत्पादित होत नाहीत, त्या बाहेरून आणाव्याच लागतील. आयात-निर्यात होतच असते. पण, परस्पर देवाण-घेवाण होत राहिली पाहिजे. आंतरराष्ट्रीय व्यापार एकतर्फी करायचा नसतो. त्यासाठी बाहेरील देशाचा आपल्यावर दबाव असू नये, अशी स्पष्ट भूमिका भागवत यांनी मांडली.



आंतरराष्ट्रीय व्यापारनितीमध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अवघ्या जगालाच वेठीला धरलेले आहे. अमेरिकेने भारताच्या वस्तूंवर २५ टक्के आयातकर लादला आहे. शिवाय, भारत रशियाकडून कच्चेतेल आयात करत असल्याने अतिरिक्त २५ टक्के असा एकूण ५० टक्के आयात कर लादला आहे. अमेरिकेने व्यापारनितीवरून भारतावर दबाव आणला असून त्यामुद्द्यावरून दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापारसंबंधांवरून भागवत यांनी भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणाची दिशा स्पष्ट केली.

भागवत यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील वेगवेगळ्या देशांमधील संघर्षाचा उल्लेख केला. पहिले महायुद्ध झाले तेव्हा लीग ऑफ नेशन तयार झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रांची स्थापना झाली. तरीही आंतरराष्ट्रीय संघर्ष थांबलेला नाही. तिसरे महायुद्ध होणारच नाही असे कोणी सांगू शकत नाही. जगभरात असहिष्णुता, अतिरेकीपणा, कट्टरता वाढलेली आहे. 'वोकिझम' आणि 'कॅन्सल कल्चर' या जगासाठी मोठ्या समस्या बनलेल्या आहेत, असे भागवत म्हणाले. तुमच्याशी दुसरा सहमत नसेल तर त्याला नाकारले जाते. त्यातून एकमेकांमधील संघर्ष वाढू लागला आहे. प्रत्येक आई-वडिलांना आपल्या पाल्यांची चिंता वाटू लागली आहे. या 'वोकिझम'चा नव्या पिढीवर काय परिणाम होणार हे त्यांना समजेनासे झाले आहे. हा अतिरेकीपणा वाढला कारण लोकांमधील संवाद संपुष्टात येऊ लागला आहे. लोकामधील व्यक्तिवादाने टोक गाठले आहे, भोगवादामध्ये लोक अधिकाधिक गुंतू लागले आहेत. भौतिकवाद आवाक्याबाहेर जाऊ लागला आहे. लोकामधील संयम संपलेला आहे. संतुलित जगणे लोक विसरले आहेत, असा मुद्दा भागवत यांनी मांडला.

## ब्राह्मण असल्यामुळे फडणवीसांचा इतका तिरस्कार, ते जर मराठा असते तर...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नागपूर**

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. देवेंद्र फडणवीसांनी आमच्या वेदना समजून घेणे गरजेचे आहे. देवेंद्र फडणवीस मुंबईत कोणत्याच आंदोलकांना आझाद मैदानावर जाण्यापासून थांबवणार नाहीत आणि गरीबांच्या वेदनेचा सन्मान करतील अशी आम्हाला आशा आहे. पण आंदोलनासाठी एक दिवसाची परवानगी ही मराठ्यांची चेष्टा आहे, अशी टीका जरांगे यांनी केली.



आंदोलनाच्य दिवसापासून जरांगे पाटील फडणवीस यांच्यावर टीका करत आहेत. त्यावर भाजप नेते आणि मसहूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी फडणवीसांची पाठराखण करत जरांगेंचा समाचार घेतला आहे. बावनकुळे म्हणाले की, महाराष्ट्रात आजपर्यंत मराठा समाजाचे अनेक नेते झाले.अनेक मुख्यमंत्रीही झाले. मात्र, मराठा समाजाला कुणीही आरक्षण देऊ शकले नाही. मराठा समाजाला पहिल्यांदा आरक्षण देण्याचे काम हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनीही आरक्षण दिले. आजही मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी फडणवीस सरकार सकारात्मकच आहे. मात्र, फडणवीस यांच्यावर जरांगे पाटील हे वारंवार टीका करत आहेत. केवळ देवेंद्र फडणवीस ब्राह्मण समाजाचे आहेत म्हणून त्यांच्यावर ही टीका होत आहे का?, ते मराठा असते तर तुम्ही कशी टीका केली असती का?, असा सवाल चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

## बिहारमध्ये खळबळ; जैशचे तीन दहशतवादी नेपाळमार्गे बिहारमध्ये शिरल्याचा संशय, पोलिसांकडून स्केच प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ पटना**

बिहार पोलीस मुख्यालयाने गुरुवारी राज्यभरात हायअलर्ट जाहीर केला. पाकिस्तानमधील दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी संबंधित असलेले तीन अतिरेकी राज्यात शिरल्याची गुप्तवार्ता मिळाल्यानंतर बिहार पोलिसांनी खबरदारीचे उपाय म्हणून हा इशारा दिला आहे. बिहार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयितांची ओळख पटली असून त्यांनी अतिरेक्यांचे स्केचही सार्वजनिक केले आहे.





पोलिसांच्या माहितीनुसार, रावळिपंडीमधील हसनैन अली, उमरकोट येथील आदिल हुसेन आणि बहावलपूर येथील मोहम्मद उस्मान अशी तीन अतिरेक्यांची नावे आहेत. गुप्तचर विभागाच्या माहितीनुसार, ते ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात काठमांडूला पोहोचले होते. मागच्या आठवड्यात त्यांनी बिहारमध्ये प्रवेश केला.

पोलिसांनी राज्याच्या सीमेवरील जिल्ह्या पोलिसांनी संशयित अतिरेक्यांच्या पासपोर्टशी संबंधित तपशील शेअर केले आहेत. तसेच सुरक्षा यंत्रणांना गस्त वाढविण्याचे आणि गुप्त सूचना गोळा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्याच्या गुप्तचर विभागांना प्रत्येक संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवून त्यावर आवश्यक ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

बिहारमध्ये ऑपरेशन सिंदूरनंतर आणि आगामी विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम लक्षात घेता भारत-नेपाळ सीमाभाग आणि सीमांचल जिल्ह्यांवर सुरक्षा वाढविण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. मधुबनी, सीतामढी, सुपौल, अररिया, पूर्व आणि पश्चिम चंपारण जिल्ह्यांसह सीमावर्ती भागात गस्त वाढविण्यात आली आहे.

बिहार आणि नेपाल यांच्यात ७२९ किमींची विस्तीर्ण अशी सीमा आहे. घुसखोरी आणि सीमेपलीकडून होणाऱ्या हालचालींसाठी बिहार हे एक प्रमुख केंद्र बनले आहे. राज्यातील सात जिल्हे खुल्या सीमेवर वसलेले आहेत. त्यामुळे या भागात सतत देखरेख आणि सुरक्षा पुरविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर असते.



## अश्लील व्हिडिओच्या धमकीवर 'डिजिटल अरेस्ट'; महिलेकडून लाखोंची लूट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शहरातील गाडगेनगर परिसरात राहणाऱ्या एका महिलेची 'डिजिटल अरेस्ट'च्या जाळ्यात सायबर भामट्यांनी तब्बल १७ लाख २० हजार रुपयांनी लूट केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'तुमच्या आधार कार्डवरून घेतलेल्या सीमवरून अश्लील व्हिडिओ व्हायरल होत आहेत,' असे सांगून महिलेला व्हिडिओ कॉलवर अटकेची भीती दाखवण्यात आली.

१९ ते २६ ऑगस्टदरम्यान ही फसवणूक घडली. सुजाता नावाच्या महिलेच्या तक्रारीवरून सायबर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध फसवणूक व आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

**कसा रचला कट?**

बनावट पोलीस अधिकारी - आरोपींनी स्वतःला मुंबई कुलाबा पोलिस असल्याचे भासवले.

व्हिडिओ कॉलवर धाक - पोलिसी वेशात बनावट कागदपत्रे दाखवून अटकेची भीती दाखवली.

१७ लाख २० हजार रुपये उकळले - रोख, एफडी मोडणे आणि गोल्ड लोन घेऊन मिळालेली रक्कम महिलेकडून ट्रान्सफर करवून घेतली.

मुलाला अटकेची भीती - फिर्यादीचा मुलगा दुबईला नोकरी करत असल्याची माहिती मिळताच, त्यालाही अटक होईल असा दम दिला.

**गोल्ड लोन, एफडीही गमावली**

सायबर भामट्यांनी महिलेला फायनान्स कंपनीकडे सोन्याचे दागिने गहाण ठेवायला लावले. लोन मिळताच ती रक्कम भामट्यांनी आपल्या खात्यात वळती केली. इतकेच नव्हे तर महिलेला एफडी मोडून ती रक्कमही पाठवण्यास भाग पाडले.

**पोलिसांचा इशारा**

१९ ते २६ ऑगस्टदरम्यान झालेल्या या प्रकारात महिलेची मोठी आर्थिक फसवणूक झाली आहे. नागरिकांनी डिजिटल अरेस्टच्या नावाने होणाऱ्या अशा फसवणुकीपासून सावध राहावे,' असे आवाहन सायबर पोलिस निरीक्षक अनिकेत कासार यांनी केले.

## त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि...! दगडूशेठ गणपतीसमोर ३५ हजार महिलांचे अथर्वशीर्ष पठण

### ऋषीपंचमीनिमित्त पहाटे स्त्री शक्तीचा जागर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८पुणे**

श्री गणेशाय नमः .. नमस्ते गणपतये.. त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि.. त्वमेव केवलं कर्तासि .. या अथर्वशीर्षच्या जयघोषाने दगडूशेठ गणपतीचा परिसर दुमदुमून गेला. तब्बल ३५ हजार महिलांनी एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला वंदन केले. विशेष म्हणजे, पाऊस असला तरी पारंपरिक वेशभूषेत मध्यरात्री २ वाजल्यापासून महिलांनी या उपक्रमाकरीता सहभागी होण्यासाठी हजेरी लावली. ऋषीपंचमीदिनी उर्जेने भारलेल्या वातावरणामध्ये अथर्वशीर्षासोबत महाआरती आणि गणरायाचा गजर करीत महिलांनी स्त्री शक्तीचा जागर केला.

निमित्त होते, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३३ व्या वर्षीच्या गणेशोत्सवात उत्सव मंडपासमोर आयोजित अथर्वशीर्ष पठण सोहळ्याचे. यावेळी खासदार सुनेत्रा पवार, पुणे विभागाच्या धर्मादाय सहआयुक्त रजनी क्षीरसागर, न्यायाधीश किरण क्षीरसागर, प्रसेनजीत फडणवीस, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महिलांनी शंखनाद केल्यानंतर सोहळ्याला प्रारंभ झाला. त्यानंतर मन शांत करणारा ओंकार जप, गजानना गजानना मंगलमूर्ती गजानना या गणेशगीताच्या सादरीकरणाने वातावरण मंत्रमुग्ध झाले. महिलांनी मुख्य अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले. मोरया मोरया दगडूशेठ मोरया... असा गणेश नामाचा गजर करताना प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावरील उत्साह ओसंडून वाहत होता. दगडूशेठच्या उत्सव मंडपापासून ते नाना वाडयापर्यंतच्या परिसरात महिलांनी अथर्वशीर्ष पठणाकरीता गर्दी केली. भक्तीरसात तल्लीन झालेल्या वातावरणात कार्यक्रमाची सांगता आरतीने झाली. महिला हात उंचावून टाळ्यांचा गजर करीत गणरायाला नमन करीत होत्या.

पुण्याचा गणेशोत्सव आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची ख्याती केवळ भारतातच नाही, तर संपूर्ण जगात आहे. त्यामुळे दगडूशेठ गणपतीचे दर्शन घेण्यासोबतच अथर्वशीर्ष पठणाच्या सोहळ्याला ॲना मारा या इटली येथील अभिनेत्रीने देखील हजेरी लावत सहभाग घेतला.

## एका समाजाचे आरक्षण दुसऱ्या समाजाला देणे योग्य नाही
## जरांगेंच्या आंदोलनावर मंत्री बावनकुळेंच विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नागपूर**

राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या भूमिकेवर ठाम आहे, पण कोणत्याही समाजाचे आरक्षण कमी केले जाणार नाही. एका समाजातून आरक्षण काढून दुसऱ्याला देणे योग्य होणार नाही. मात्र याबाबत काँग्रेसने आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी असे मत व्यक्त करत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनावरून राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. आरक्षणाबाबत काँग्रेस नेत्यांची भूमिका नेहमीच गोंधळलेली आहे. राहुल गांधी म्हणतात, ओबीसी आरक्षण कायम ठेवा, जातीय जनगणना करा. पण महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते ओबीसी आरक्षण काढून मराठ्यांना देण्याची भाषा करतात. त्यामुळे काँग्रेसने मराठा आरक्षणाबाबत - नक्की भूमिका काय? हे स्पष्ट करावे असेही बावनकुळे म्हणाले.

आंदोलनाचा अधिकार सर्वांना आहे, मात्र गणेशोत्सवासारख्या महत्त्वाच्या सणात आंदोलन करणे योग्य नाही. चार दिवसांनी आंदोलन झाले असते तरी हरकत नव्हती असेही बावनकुळे म्हणाले.२०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना मराठा आरक्षणाचा ऐतिहासिक निर्णय झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणिउपमुख्यमंत्री अजित पवार सरकारही त्याच भूमिकेत आहे की, आरक्षण ओबीसींच्या कोट्यातून न देता स्वतंत्र द्यावे, असे त्यांनी सांगितले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणासाठी खूप काम केले. त्यांच्यावर जातीवरून टीका करणे चुकीचे आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे आहे, असे बावनकुळे म्हणाले.

## नागपूरच्या चार वकिलांची उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती

### सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने केंद्र सरकारला दिलेला प्रस्ताव मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नागपूर**

नागपूर येथील ॲड. मेहरोज अश्रफ खान पठाण, ॲड. राज दामोदर वाकोडे, ॲड. नंदेश शंकरराव देशपांडे व ॲड. रजनीश रत्नाकर व्यास, या चार वकिलांची मुंबई उच्च न्यायालयामध्ये अतिरिक्त न्यायमूर्तिपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

न्यायालयाच्या सर्वोच्च कॉलेजियमने यासंदर्भात काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारला सादर केलेला प्रस्ताव बुधवारी मंजूर करण्यात आला. ॲड. मेहरोज खान पठाण मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये



राज्य सरकारचे वकील आहेत, तर ॲड. नंदेश देशपांडे डेप्युटी सॉलिसिटर जनरल ऑफ इंडिया (केंद्र सरकार) आहेत. ॲड. राज वाकोडे व ॲड. रजनीश व्यास खासगी वकिली करतात, तसेच ॲड. वाकोडे महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ व महावितरण कंपनीचे स्थायी अधिवक्ता आहेत. या चारही विधिज्ञांना वकिली व्यवसायाचा दीर्घ अनुभव आहे. ॲड. वाकोडे २००४, ॲड. देशपांडे १९९७, तर ॲड. व्यास २००१ पासून या व्यवसायात कार्यरत आहेत. यादरम्यान त्यांनी संवैधानिक, दिवाणी, फौजदारी इत्यादी प्रकरणे यशस्वीपणे हाताळली आहेत. त्यांची आतापर्यंतची यशस्वी कारकीर्द लक्षात घेता, त्यांना अतिरिक्त न्यायमूर्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**१४ वकिलांचा समावेश**

सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने नागपूर येथील चौघांसह एकूण १४ वकिलांची अतिरिक्त न्यायमूर्तिपदी नियुक्ती करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार इतरही वकिलांची अतिरिक्त न्यायमूर्तिपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये ॲड. संदेश पाटील, ॲड. श्रीराम सिरसाट,ॲड. रणजीतसिंह राजा भोसले, ॲड. आशिष चव्हाण, ॲड. फरहान दुबाश, ॲड. आबासाहेब शिंदे, ॲड. हितेन वेणेगावकर, ॲड. अमित जामसांदेकर, ॲड. वैशाली पाटील-जाधव व ॲड. सिद्धेश्वर ठोंबरे यांचा समावेश आहे.

## संपादकीय ......

# मुंबईच्या गणेशोत्सवावर अट्टाहासाचे काळे ढग सहन केले जाणार नाहीत!

*मराठा आरक्षणाचा मुद्दा घेऊन मनोज जरांगे दोन वर्षांपासून लढत आहेत. आता त्यांनी पुन्हा एकदा मुंबईत आंदोलनाचा घाट घातला आहे, त्यासाठीची त्यांनी निवडलेली वेळ मात्र सर्वांनाच खटकत आहे. मनोज जरांगे हे जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून २७ ऑगस्टला निघणार आणि शिवनेरीमार्गे २९ ऑगस्टला मुंबईतील आझाद मैदानात पाऊल ठेवणार, असे त्यांचे नियोजन आहे. २७ तारखेला श्रीगणेशाचे आगमन होत आहे. दहा दिवसांचा हा उत्सवाचा, उत्साहाचा काळ आहे. मुंबईतील जनजीवन विस्कळीत होऊ नये म्हणून आझाद मैदानात आंदोलनाला परवानगी देता येणार नसल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे. ते अगदी खरे आहे. मुंबईतील गणपती उत्सवाबद्दल वेगळं सांगण्याची गरज नाही. राज्यभरातून, देश-विदेशातून येथील गणपती उत्सव पाहण्यासाठी लोक येत असतात. लालबागचा राजाचे केवळ मुखदर्शन व्हावे यासाठी लाखोंची रांग लागते. देशाचे गृहमंत्री अमित शहा उत्सव काळात सुरुवातीचे दोन दिवस मुंबईत मुक्कामाला आहेत. अनेक केंद्रीय मंत्री, उद्योगपती, सेलिब्रिटी गणरायाच्या दर्शनासाठी येत असतात. यामुळे पोलीस यंत्रणेवर प्रचंड ताण असणार आहे.*

*मुंबई आणि राज्यातीलच एकूण सुरक्षा व्यवस्थेचा आढावा मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांनी घेतला. एकट्या मुंबईत १७ हजारांहून अधिक पोलिसांचा फौजफाटा गणपती उत्सवकाळात तैनात असणार आहे. फक्त पोलीसच नाही तर एसआरपीएफ, क्यूआरटी टीम, दंगल नियंत्रण पथक, वाहतूक पोलीस, आरपीएफ प्लाटून, एसआरपीएफ प्लाटून, होमगार्ड अशी विविध पथके या काळात सुरक्षेसाठी तैनात असणार आहेत. एवढी सगळी सुरक्षा यंत्रणा असूनही छोट्या-मोठ्या घटना या होतच असतात. मुंबई हे हायपर सेन्सेटीव्ह शहर आहे. गणरायाच्या उत्सवात अख्खी मुंबई भक्तीरसात दंग झालेली असते. या उत्सवाला गालबोट लागू नये म्हणून हा सगळा बंदोबस्त असतो. यामध्ये मराठा आंदोलकांचा मोर्चा मुंबईत दाखल झाला तर सुरक्षा यंत्रणेवर प्रचंड ताण येण्याची शक्यता आहे. मराठा आरक्षणाचा मुद्दा अतिसंवेदनशील आहे. याआधीची मनोज जरांगे यांची आंदोलने पाहिली, त्यासाठी जमलेला जनसमुदाय पाहिला तर मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून जर मराठा आरक्षण आंदोलक मुंबई शहरात आझाद मैदानात दाखल झाले तर त्यांच्या सुरक्षेचा, राहण्याचा आणि इतरही अनेक बाबींचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये २०१८ मध्ये आंदोलनावेळी काकासाहेब शिंदे या तरुणाने आंदोलन तीव्र झाल्यानंतर गोदावरी नदीत उडी घेतली होती. यामुळे मुंबईतील आंदोलनावेळी सुरक्षा यंत्रणेला डोळ्यात तेल घालून काम करावे लागेल. ऐन गणपती उत्सवकाळात हे आंदोलन करणार असल्याचे जाहीर केल्यामुळे सुरक्षेसह अनेक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबईत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीसह कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी उच्च न्यायालयाने जरांगे पाटलांना मुंबईऐवजी खारघर येथील जागेचा पर्याय दिला आहे. उच्च न्यायालयाने आंदोलनाच्या अधिकारावर गदा आणलेली नाही. मनोज जरांगे यांनी आंदोलनासाठी परवानगीच घेतलेली नाही, असे कळल्यानंतर न्यायालयाने जरांगे यांनी आंदोलनासाठी यंत्रणेकडे परवानगी मागावी, ती दिली तर शांततेत मुंबईऐवजी नवी मुंबई, खारघरमध्ये आंदोलन करावे हेही स्पष्ट केले आहे. त्यामुळे न्यायालयाने जरांगेची बाजू मांडण्यासाठी त्यांच्या वतीने न्यायालयात कोणी नसतानाही त्यांच्या आंदोलनाच्या स्वातंत्र्याचे हनन होऊ दिलेले नाही.*

*सरकारी पातळीवरुन जरांगेंना आंदोलन पुढे ढकलण्यासाठी अनेक अर्जवे करण्यात आली. गणपती उत्सव होऊ द्या, त्यानंतर आंदोलन करा, असा मुख्यमंत्र्यांचा निरोप घेऊन गेलेल्या ओएसडींना रिकाम्या हाताने परतावे लागले. गेल्या दोन वर्षांमध्ये अनेकदा उपोषणे झाली. मराठवाड्यातील मराठा समाजाकडे कुणबी दाखले असतील तर त्यांना कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र देण्यासाठी न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती काम करत आहे. या समितीला सहा महिने मुदतवाढ देण्यात आली, या मुदतवाढीला मराठा आंदोलकांनीही मान्यता दिलेली आहे. याशिवाय मराठा आरक्षणासाठी मंत्रिमंडळ उपसमिती काम करत आहे. राधाकृष्ण विखे-पाटील समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीने हैदराबाद गॅझेट आणि इतरही गॅझेटचा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. कायद्याच्या प्रक्रियेत काही बाबी अडकल्या आहेत. त्यावर चर्चेने तोडगा निघू शकतो मात्र, चर्चेचा आता कंटाळा आला असे म्हणणे लोकशाहीत योग्य होणार नाही.*

*आंदोलनाने शक्तिप्रदर्शन होईल. महामुंबईत महाजनसमुदायावर नियंत्रण ठेवणे एका व्यक्तीला शक्य होईल का, याचाही विचार होण्याची गरज आहे. भलेही जरांगे यांनी चार महिन्यांपूर्वी २९ ऑगस्टपासून मुंबईत आंदोलनाचा इशारा दिला होता, गेल्या चार महिन्यात सरकारने त्या इशार्याकडे दुर्लक्ष केले. मात्र श्रीगणेशाच्या उत्सवकाळात मुंबईला, मुंबईकरांना आणि सुरक्षा यंत्रणेला वेठीस धरुन मुंबईकरांना अधिक संकटात टाकण्याचे काम होऊ नये, ही अपेक्षा ठेवणे गैर नाही. आंदोलनाचा श्रीगणेशा उत्सवानंतर अधिक जोमानेही होऊ शकतो, त्यासाठी गणरायाचा आशीर्वाद पाठीशी आहेच, याचे भान आणि संयम आंदोलकांनी ठेवला तर उत्सवात मंगलमय वातावरण राहील. गणेशोत्सवकाळात मुंबईला मराठा आंदोलकांच्या अट्टाहासाचे गालबोट लागू नये हीच अपेक्षा.*

## उत्साहाचा उध्दार:

# पी. आर. पोटे पाटील ग्रुपमध्ये 'ऑपरेशन सिंदूर' ची धमाल



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपमध्ये यंदा गणेशोत्सवाचे आगमन दणदणीत उत्साहात व भक्तिभावाने झाले. पी. आर. पोटे पाटील ग्रुपचा राजा ची विधिवत स्थापना संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोट पाटील यांच्या हस्ते सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व उपप्राचार्य, डीन, प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. गणपती बाप्पा मोरया च्या जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. आरती व भजन-कीर्तनांच्या गजरात बाप्पाचे स्वागत होताच वातावरण प्रसन्न व मंगलमय झाले. यावर्षीच्या गणपती सजावटीमध्ये एक वेगळे व देशभक्तीचे संदेश देणारे स्वरूप पाहायला मिळाले. अलीकडेच पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरार्थ भारत सरकारने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर या विशेष लष्करी मोहिमेवर आधारित आकर्षक सजावट करण्यात आली होती. या सजावटीत भारतीय जवानांचे शौर्य, दहशतवादाविरोधातील त्यांची लढाई व मातृभूमीच्या रक्षणासाठी दिलेले योगदान अत्यंत प्रभावी पद्धतीने साकारण्यात आले.

सजावटीत भारतीय तिरंगा, सीमा भागातील पराक्रमी सैनिकांचे प्रतिरूप, तसेच आतंकवाद्यांच्या हल्ल्याला दिलेले प्रत्युत्तर याचे दृश्यरूप साकारले गेले होते. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे समाजात देशभक्तीचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश पोहोचविला.


स्थापना सोहळ्यानंतर झालेल्या आरतीत सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि उपस्थित मान्यवरांनी सहभाग घेतला. सुरेल भजन-कीर्तनांनी आणि मंत्रोच्चारांनी वातावरण अधिकच भावमय झाले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून सामाजिक व राष्ट्रीय जाणीव जागृत करण्याचे माध्यम आहे, याचे दर्शन या सजावटीतून घडले.पुढील काही दिवस विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमांद्वारे गणरायाची आराधना केली जाणार आहे.

# कुत्रा चावल्यानंतर इंजेक्शन किती वेळात घ्यावे?

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**




देशभरात भटक्या कुत्र्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी कुत्र्यांनी लोकांना चावल्याच्या घटना वाढल्या आहेत. अशा घटनांमध्ये सर्वात मोठा धोका म्हणजे रेबीज हा घातक आजार. योग्य वेळी इंजेक्शन न घेतल्यास हा आजार मेंदू, हृदय आणि मज्जासंस्था बंद पाडतो आणि शेवटी मृत्यूही होऊ शकतो. म्हणूनच कुत्रा चावल्यानंतर नेमकं काय करावं, किती तासांत इंजेक्शन घ्यावं, हे जाणून घेणं अत्यंत गरजेचं आहे.



**इंजेक्शन किती वेळेत घ्यावे?**

कुत्रा चावल्यानंतर शक्य तितक्या लवकर इंजेक्शन घेणे अत्यावश्यक आहे. पहिला डोस तात्काळ दिला जातो, ज्याला झिरो डोस म्हणतात. त्यानंतर ०, ३, ७, २१ आणि आवश्यक असल्यास २८ व्या दिवशी लसीकरण केले जाते. हे पाच डोसचे शेड्यूल जीवघेण्या रेबीजपासून संरक्षण देते.

**का घ्यावे त्वरित उपचार?**


विलंब झाल्यास विषाणू मज्जासंस्थेत पोहोचतो आणि मग उपचाराचा परिणाम होत नाही.

रेबीजचा आजार एकदा झाल्यावर त्यावर कोणताही उपचार नाही, त्यामुळे इंजेक्शन हेच जीवन वाचवण्याचे साधन आहे.

भारतात दररोज हजारो लोकांना कुत्रे चावतात. यातील अनेक रुग्ण उशिरा हॉस्पिटलमध्ये पोहोचल्याने त्यांचा जीव धोक्यात येतो.

कुत्रा चावल्यानंतर घाबरण्यापेक्षा त्वरित उपाय करणं अधिक महत्त्वाचं आहे. जखम स्वच्छ धुऊन, अँटीसेप्टिक लावून, त्वरित हॉस्पिटलमध्ये जाऊन इंजेक्शन घेणं हेच आयुष्य वाचवण्याचा खात्रीशीर मार्ग आहे.

# तीन प्रकारच्या बुरशीपासून तूर पिकाचे संरक्षण कसे कराल? वाचा सविस्तर




**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यातील बहुतांश भागात पाऊस सुरूच आहे. काही जमिनीत निचरा लवकर होतो तर भारी काळ्या जमिनीत पाण्याचा निचरा लवकर होत नाही. शिवाय सतत रिमझिम पावसामुळे जमीन ओली असते. अशा जमिनीत तूर पिकावर खोडावर मुळावर फायटोप्थोरो या हानिकारक बुरशीचा प्रादुर्भाव होत असतो. अशा वेळी शेतकऱ्यांनी त्वरित बुरशीनाशक आळवणी करावी, असे आवाहन डॉ दिलीप हिंगोले यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर शहराला लागून असलेल्या कांचनवाडी येथील भाऊसाहेब मोटे यांनी त्यांच्या शेतातील प्रादुर्भावग्रस्त तूर पिकाचा नमुना विभागीय कृषी विस्तार शिक्षण केंद्रात आणला होता. त्या नमुन्याचे पाहणी करत डॉ. दिलीप हिंगोले यांनी हा फायटोप्थोरा या बुरशीचा प्रादुर्भाव आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी खालील प्रमाणे तूर पिकावर आळवणी करावी.

मेटालक्झिल एक ग्रॅम एक लिटर पाण्यात (१०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम) घेऊन द्रावण तयार करत पिकाच्या मुळाभोवती आळवणी करावी.

बुंध्यावर देखील द्रावण पडेल याची काळजी घ्यावी.

किंवा रेडोमिल अडीच ग्रॅम एक लिटर पाण्यात घेऊन आळवणी करावी (१०० लिटर पाण्यात २५० ग्रॅम)

**अथवा**जैविक बुरशीनाशक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ निर्मित बायोमिक्स याचा एकरी चार लिटर या प्रमाणे उपयोग करावा.

तीनशे लिटर पाण्यात ४ लिटर बायोमिक्स हे बुरशीनाशक किडनाशक घेत पिकावर आळवणी करावी.

**दुसरी बुरशीचे नियंत्रण**

यानंतर दुसरी बुरशी म्हणजे मायक्रोफोमिना या हानीकारक बुरशीचा प्रदूभाव पुढील म्हणजे सप्टेंबर महिन्यात होत असतो. याची लक्षणे म्हणजे तूर पिकाच्या फांदीवर काळे चट्टे पडतात आणि नंतर पिक वाळून जाते. अशावेळी अगोदर साफ या बुरशी नाशकचा फवारणी करावी.

**तिसरी बुरशीचे नियंत्रण**

तिसरी जी बुरशी या पिकावर येते, ती पिकाला शेंगा आल्यानंतर येते. या बुरशीचे नाव फ्युजिरियम असे आहे. ही येण्याचे शास्त्रीय कारण म्हणजे जमिनीत ओलीचा अभाव असल्यावर येते, म्हणून पिकाला शेंगा लागतेवेळी जमिनीत ओलावा असणे गरजेचे असते. अशा प्रकारे शेतकऱ्यांनी तूर पिकाचे या तीन बुरशीपासून संरक्षण करावे.

दुसरा जैविक उपाय म्हणजे तूर पिकास जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर या तीन महिन्यात ट्रायकोड्रमा अथवा बायोमिक्स याचा एकरी चार लिटर वापर करावा. यामुळे तुमच्या जमिनीतील हानिकारक बुरशी कमी होतील. त्यामुळे तूर पिकाचे सरक्षण होईल, याचा वापर मात्र जमिनीत ओल असताना करावा. कोरड्यात करू नये.

**- रामेश्वर ठोंबरे,** विभागीय कृषी विस्तार शिक्षण केंद्र, छत्रपती संभाजी नगर

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# आ.सौ.सुलभाताई संजय खोडके यांच्या निवासस्थानी श्री. गणरायाची विधिवत स्थापना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** रिद्धी सिद्धीचे दैवत मांगल्याचे प्रतीक विघ्नहर्ता श्री. गणरायाचे आज गणेश चतुर्थीला आगमन झाले असून अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या गाडगेनगर स्थित निवासस्थानी श्रींची विधिवत स्थापना करण्यात आली आहे. दहादिवसीय गणेशोत्सवात श्री. यश खोडके व समस्त खोडके परिवार तल्लीन झाले असून आमदार महोदयांनी सर्व अमरावतीकरांना सुख -समाधान, समृद्धी व भरभराटीसाठी यावेळी श्रीगणरायाच्या चरणीनतमस्तक होऊन विश्वमांगल्याची मनोकामना केली आहे. तसेच सर्व अमरावतीकरांना गणेशोत्सवाच्या निमित्ताने शुभेच्छा दिल्या आहेत.

# तिवसा तालुक्यात सोयाबीनवर 'येलो मोझॅक'चे संकट

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८तिवसा-** तिवसा तालुक्यातील सार्सी गावासह परिसरातील अनेक गावांमध्ये मुसळधार पावसामुळे शेतकर्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः सोयाबीन पिकावर या पावसाचा मोठा परिणाम झाला असून शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले आहेत. नाल्याचे पाणी शेतात शिरल्यामुळे शेतकर्यांची अवस्था अधिकच दयनीय झाली आहे. पिके हिरवीगार दिसत असली तरी सोयाबीनच्या शेंगा कोमेजून पडू लागल्या आहेत. कुणाच्या शेतात पूर्ण पीक पिवळसर होऊन लागलेल्या शेंगाही गळाल्या आहेत. शेतकर्यांनी एकरी तब्बल १५ हजार खर्च करून मेहनतीने उभे केलेले पीक आता पूर्णपणे वाया गेल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. सार्सी परिसरासोबतच नाल्यालगत असलेल्या शेंदुरजना बाजार येथील शेतकर्यांचेही मोठे नुकसान झाले आहे. प्रभाकर भगत यांच्या शेतात नाल्याचे पाणी घुसल्याने सोयाबीनचे संपूर्ण पीक पिवळसर पडले असून शेंगा गळून पिके निकामी झाली आहेत.



गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे डेहणी गावासह तालुक्यातील इतर अनेक गावांमध्ये शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. पिके हातचे गेल्याने हंगाम हातातून निसटला आहे. या सगळ्या परिस्थितीवर शासन आणि कृषी विभागाने तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे. त्वरित पंचनामे करून शेतकर्यांना योग्य ती नुकसान भरपाई द्यावी. तसेच शेतकर्यांना शंभर टक्के अनुदानावर हरभर्याचे बियाणे व खते उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सरपंच शीतल मोहोड यांनी केली आहे.

### शेतकऱ्यांनी संपर्क साधावा

-सद्य स्थितीत आमच्या विभागाकडे येलो मोझॅक या रोगासंबंधी शेतकर्यांची कोणतीही लेखी तक्रार आलेली नाही. तरीही शेतकर्यांच्या हितासाठी विभागामार्फत सतत जागृती मोहीम राबविली जात आहे. व्हॉट्सॲप ग्रुप, विभागाचे अधिकृत चॅनल व जाहिरातींच्या माध्यमातून पूर्वसूचना दिल्या आहेत. शेतकर्यांनी जरा सतर्क राहून पीक निरीक्षण करावे व अडचण आल्यास त्वरित कृषी विभागाशी संपर्क साधावा. **-हेमलता इंगळे** कृषी अधिकारी, तिवसा

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २८ ऑगस्ट २०२५ शहर/ग्रामिण

# अमरावतीत फुलांचा 'राज' गुलाब ४००; गणेशोत्सवासाठी फुल बाजारपेठ कडाडली





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

गणेश स्थापनेच्या पहिल्या दिवशी अमरावतीत फुलांचा बाजार जोरात गजबजला. एरवी स्वस्तात मिळणारी फुले बुधवारी लोटली, तर गुलाब ४०० रुपये किलो आणि शेवंती ३२० रुपये किलो पासून विकली गेली.सणोत्तेजक वातावरणामुळे आणि पर्यावरण पूरक गणपतीच्या लोकप्रियते मुळे लोकांनी नैसर्गिक फुलांकडे प्राधान्य दिले. त्यामुळे फुल उत्पादकांच्या चेहऱ्यावर हसऱ्या दिसून आल्या. सणासुदीच्या या काळात नागरिक ही भक्तिभावाने भरलेले असतात, त्यामुळे थोडे अधिक पैसे मोजूनही फुल खरेदी करण्यास ते तयार असतात. फुल विक्रेत्यांचे म्हणणे आहे की, अशा सणासुदीला आमच्या मदतीला देवच धावून येतो. परिणामी आम्हाला यावेळी चांगला भाव मिळाला.गणेशोत्सवाचा उत्साह आणि फुलांची मागणी या दोन्ही गोष्टींनी बाजारपेठ रंगली, तर फुल विक्रेत्यांच्या चेहऱ्यावर समाधान स्पष्ट दिसून आले.झेंडूच्या बाबतीतही हेच सूत्र दिसून आले. त्यामुळे झेंडूची फुले प्रतिकिलो ८० रुपयांपासून तर शेवंतीची फुले ३२० रुपयांपासून अधिक दरात विकली गेली. बहुतेकांची धाव पांढऱ्या, पिवळ्या, जांभळ्या व लाल शेवंतीकडे होती. याशिवाय मोगरा, जरबेरा, लिली या फुलांकडेही लोकांचा ओढा दिसून आला. सहज उपलब्ध होणारी अस्टर आणि झेंडूची फुलेही बाजारात उपलब्ध होती. परंतु तुलनेने त्याला कमी पसंत केले गेले

# दर्यापूर तालुक्यातील ७४ गावांमध्ये होणार स्वयंचलित हवामान केंद्र सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८दर्यापूर-**

तालुक्यातील ७४ गावांमध्ये केंद्र शासनाच्या विंडस् या योजनेतून ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र उभारण्यात येणार असून जागा निवड करण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने ग्रामपंचायतीशी संपर्क साधण्यात येत असून लवकरच तालुक्यातील गावागावात स्वयंचलित हवामान केंद्र उभे राहणार असल्याने नैसर्गिक आपत्तीत झालेल्या नुकसानीची व हवामान विषयक अचूक माहिती मिळणार असल्याने शासकीय धोरण,अनुदान व योजनेसाठी याचा मोठा फायदा होणार आहे.महावेध प्रकल्पांतर्गत राज्यात महसुल मंडळ स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. सदर हवामान केंद्रांद्वारे प्राप्त होणारी माहिती ही ज्या ठिकाणी हवामान केंद्र स्थापन आहे अशा स्थानी असणाऱ्या हवामान परिस्थितीसंदर्भातील असते. हवामान केंद्र स्थापन असणाऱ्या ठिकाणी हवामान परिस्थिती ही महसूल मंडळामध्ये समाविष्ट असणाऱ्या इतर गावांच्या स्थानिक हवामान परिस्थितीपेक्षा भिन्न असण्याची मोठ्या प्रमाणावर शक्यता असते. ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची स्थापना केल्यास हवामान विषयक ग्रामपंचायत निहाय विशिष्ट माहिती प्राप्त होणार आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून चक्रीवादळ, दुष्काळ, भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, ढगफुटी, थंडीची लाट व कडाक्याची थंडी या नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत मिळणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणा करण्यात आल्यास अनेक फायदे होणार आहेत.

**फायदे-** चक्रीवादळ, दुष्काळ, आग, पूर, गारपीट, ढगफुटी, थडीची लाट व कडाक्याची थंडी इ. नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने हवामान विषयक माहिती उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने देखिल ग्राम पंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची स्थापना उपयुक्त ठरणार आहे. राज्यातील सर्व गावांमधील हवामान विषयक अचूक माहिती प्राप्त व्हावी, शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शन प्राप्त व्हावे, कृषि हवामान क्षेत्रात संशोधनासाठी तसेच नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने हवामान विषयक आवश्यक ती माहिती प्राप्त व्हावी, स्वयंचलित हवामान केंद्रांद्वारे प्राप्त माहितीचा वापर कृत्रीम बुध्दीमत्ता प्रणाली तसेच आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे हवामान विषयक माहितीचे संकलन, विश्लेषण, शेतकऱ्यांना योग्यवेळी मार्गदर्शन इ. बाबींसाठी उपयुक्त ठरणार आहे. तसेच यापूर्वी तालुक्यातील थीलोरी,दारापूर,रामतीर्थ,सामदा,खल्लार,येवदा वडनेर गंगाई व दर्यापूर या ८ महसूल मंडळात स्वयंचलित हवामान केंद्र होते.

# आझाद हिंद मंडळाची श्री च्या स्थापनेची भव्य शोभायात्रा ठरली आकर्षक



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

स्थानिक आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावती च्या सलग ९८ व्या वर्षी श्री गणेशाच्या स्थापनेची भव्य शोभयात्रा अतिशय उल्हासात, आनंदात संपन्न झाली मंडळाच्या शोभयात्रेत आझाद हिंद महिला मंडळाचे सामूहिक ध्वज व दिव्य नृत्य तसेच मंडळाच्या मुलींचे श्री गणेश वंदना नृत्य तसेच लहान मोठ्या सर्व कार्यकर्त्यांचे लेझीम नृत्य व मंडळाच्या सर्वच लहान मोठया कार्यकर्त्यांनी एक सारखा धारण केलेला पेहरावा मुळे शोभयात्रा अधिकच आकर्षक ठरली.तसेच वारकरी दिंडी, अमरावती मधील प्रसिद्ध श्री छत्रपती ढोल पथक, ट्रॅक्टर वर लोकमान्य टिळक व स्व हरिभाऊ कालोती यांचे प्रतिमा, प्रसिद्ध मूर्तिकार यांनी तयार केलेली श्री गणपती बाप्पा ची आकर्षक मूर्ती विराजमान होती. शोभा यात्रेचा संपूर्ण मार्ग गणपती बाप्पा मोरया च्या जय जयकारांनी दुमदुमून गेला.शोभयात्रेची सुरवात बुधवारा चौकात श्री ची आरती करून करण्यात आली या वेळी अध्यक्ष म्हणून पदमश्री श्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्षखासदार श्री बळवंतराव वानखडे, श्री विलास इंगोले माजी महापौर, उपाध्यक्ष श्री अनंतराव गुढे माजी खासदार व डॉ. किशोर फुले, कोषाध्यक्ष श्री दिलीप दाभाडे, सचिव श्री दिलीप कालोती, प्रदीप वडनेरे माजी आमदार,ऍड प्रशांत देशपांडे,ज्ञानेश्वर हिवसे, विवेक कलोती माजी स्थायी समिति सभापती, संतोष बद्रे, महानगर प्रमुख शिवसेनाराजाभाऊ माजलगावकर, चंदूभाऊ पवार, प्रकाश भाऊ सगेकर,किशोर बोराटणे, प्रा. गणेश मालोकर संजय मुचळबे सतीश चौधरी, अजित वडवेकर, नंदकिशोर गुम्बळे शैलेश अग्रवाल, गणेशोत्सव २०२५ चे अध्यक्ष श्री दीपक गुडधे स्वागतध्यक्ष प्रवीण मानेकर, कार्याध्यक्ष, रामेश्वर उपाध्याय, उपाध्यक्ष राजाभाऊ अडगूलवार डॉ प्रथमेश बोके, मो. जावेद साबीर सचिव निलेश वानखडे ,कोषाध्यक्ष नरेंद्र बेनी सहसचिव तन्मय पिंजरकर, गणेश अग्निहोत्री, शुभम काशीकर, आकाश मोहोड, तन्म्य पिंजरकार यांचे सह मंडळाचे सर्व सदस्य सर्व श्री ,भूषण पुसतकर, प्रसाद मोरे, रामाभाऊ चावंडे दिवाकर चिखलकर, , नितीन सराफ, ऍड. विजय संगेकर, मयूर जलतारे राजेश जायदे, जयंत कलोती नंदू गुम्बळे, निलेश सराफ, गुड्डू ढोले, संतोष चिखलकर अजय इंगोले ,उदापूरे बंधू, प्रा. गणेश मलोकर भैया इंगोले ,अण्णा करणें ,नितीन इंगोले पांडुरंग रायकवार, राजू हिरपूरकर, सुनील महल्ले, संजय हिरपूरकर नंदू माकवाने सुरेश चिखलकर, अशोक बामणगांवकर, ऍड चंदू डोरले, डॉ संजय तिरथकर,विशाल फाटे, डॉ आकाश मोरे, जयंत कालोती, विनोद घोडेगावकर,दीपक इंगळे किरण उदापुरे उमेश देशमुख संजय कदम नितीन फुसे मनीष चोधरी मनीष काजणेकर अमित काजणेकर अवी अनासने संदीप कुटारिया राजू बोराटणे सुरेश वैश्य मदन पुसतकर नाना उदापुरे राजा पिंजरकर सतीश बद्रे सागर इंगोले रोशन पुसतकर अनिकेत नवघरे किशोर पुसतकर, संजय गुम्बळे, किरण उदापुरे, नाना उदापुरे, नितीन कोहळे, रवि पाटमासे,सचिन कोहळे, मुन्ना दुलारे किरण विंचूरकर प्रेमानंद पुसतकर अजय पुसतकर, रेवण पुसतकर प्रथमेश बाखडे कृष्णा हिवसे आर्यन ढोले, वेदांत डांगे, राहुल कथलकर योगेश पुंड, सचिन भेरडे, अशोक पोहेकर, राहुल चिखलकर, सुरेश चिखलीकर, विजू गावंडे, सुनील तिप्पट संजय पाटील यांचे सह अनेक ज्येष्ठ सदस्य व कार्यकर्ते व हजारो गणेशभक्त उपस्थित होते.-

# गवळणीच्या नृत्यात, ढोल-झांजांच्या गजरात तळेगाव ठाकूरात बाप्पा विराजमान

**(सुनील घोरमाडे) विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.२८तिवसा-** तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर मध्ये गणपती बाप्पाची मिरवणूक मोठ्या थाटामाटात पार पडली. पारंपारिक ढोल, झांज च्या निनादात तसेच गणपती बाप्पा मोरया अशा जय घोषाने परिसर दुमदूमला होता.विशेष म्हणजे या मिरवणूकीत पारंपारिक ढोल, झांज तसेच त्यामध्ये गवळणी गवळीनीचे नृत्य हे प्रमुख आकर्षण ठरले असून त्याचे कारण म्हणजे आताच्या काळातले डीजे बंजियो मुळे ही पारंपारिक ढोल वाजवणे ही कला लोप पावत चालली आहे. तळेगाव मधील हजारो नागरिकांनी ह्या उत्सवामध्ये सहभाग नोंदवून चांगली गोष्ट आहे गणपती बाप्पाच्या मिरवणूकीचा आनंद घेतला.तळेगाव मध्ये गणपती मंडळाने आयोजित केलेला सोहळा केवळ एक मिरवणूक नव्हता तर तो एक पारंपरिक ढोल वाजवणे ही कला नागरिकाच्या मनात निर्माण करणे.कारण आजच्या काळात डीजे च्या कर्कश आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होत आहे.तळेगाव मध्ये संध्याकाळी चार वाजता सुरु झालेली शोभयात्रा मुख्य चौका पासून ते गावातून मार्गक्रमण करून मिरवणूक काढली होती.प्रत्येक पाऊलात आणि उत्साह वाढला होता. पारंपरिक ढोल, झांज च्या गजरात गवळणी तसेच तरुणाई मोठ्या उत्साहाने फिरकत होती.

# ११५ वर्षांनी आज पुन्हा तोच दिवस, तीच तिथि - अद्भुत योग!

## शेगावात ऋषी पंचमी महोत्सवाचे औचित्य



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८शेगाव** -जय गजानन माऊली! माऊलींच्या कृपाशिर्वादाने यंदाचा ऋषी पंचमी महोत्सव एक ऐतिहासिक योग घेऊन येत आहे.आज दिनांक २८ ऑगस्ट २०२५ (भाद्रपद शुक्ल पंचमी, वार गुरुवार) रोजी हा महोत्सव साजरा होत असून, नेमके ११५ वर्षांपूर्वी म्हणजेच २८ ऑगस्ट १९१० रोजी याच तिथी व दिवशी गजानन महाराजांनी शेगावात समाधी घेतली होती.

हा अद्भुत संयोग पुन्हा एकदा शताब्दी उलटून अवतरला असून भाविकांसाठी हे एक अलौकिक योगायोग ठरत आहे. शेगाव नगरीत या पार्श्वभूमीवर विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. भाविक, भक्तगण आणि सेवेकरी यांच्यासाठी हा दिवस पर्वणीसमान मानला जात आहे.दरवर्षीप्रमाणेच ऋषी पंचमी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र यंदाच्या तिथी आणि वाराच्या योगामुळे भक्तांमध्ये उत्सुकता आणि आध्यात्मिक आनंद अधिकच वाढला आहे. समाधीस्थळावर विशेष पूजन, महाआरती, हरिपाठ, भजन आणि कीर्तनाच्या कार्यक्रमांनी वातावरण गजाननमय होणार आहे.स्थानिकांसह राज्यभरातून आणि देशविदेशातून हजारो भाविक शेगावात दाखल होण्याची शक्यता असून प्रशासन व संस्थानाने यासाठी विशेष व्यवस्था केली आहे. भक्तांच्या मनात एकच भावना - जय गजानन माऊली, माऊलींच्या कृपेनेच हा दिव्य संयोग अनुभवायला मिळत आहे!

# राजकमल उड्डाणपुलावर मौन का? प्रशासनाचा कारभार संशयास्पद

## तुषार भारतीयांचा सवाल!



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती** - शहराच्या मध्यवर्ती राजकमल चौकातील रेल्वे उड्डाणपुलावर प्रशासनाचा कारभार चक्क गोंधळलेला दिसतो. काही दिवसांपूर्वी फक्त जड वाहनांना बंदी घातली, नंतर दुचाकी, चारचाकी आणि आता तर पादचारीसुद्धा बंद! अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे संपूर्ण शहरात वाहतूक कोंडी, नागरिकांची गैरसोय आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे प्रचंड संभ्रम निर्माण झाला आहे.भारतीय यांचा जोरदार सवाल - पुल कोणत्याही क्षणी कोसळू शकतो असे जर प्रशासनाला वाटत असेल, तर शेकडो प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या रेल्वे गाड्यांची जबाबदारी कोण घेणार? पादचारीपेक्षा कित्येक पट जास्त कंपन रेल्वेमुळे निर्माण होतात. मग याकडे डोळेझाक का?

नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न टाळाटाळीत चालू ठेवणं हे प्रशासनाचं निष्काळजीपण आहे, अशी टीका करत तुषार भारतीय यांनी तातडीने पत्रकार परिषद घेऊन पुलाची खरी माहिती जाहीर करण्याची मागणी केली आहे.

# बंद चौफुली व रेल्वे उड्डाणपुलामुळे वाहतुकीचा तिढा; नागरिक संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

,शहरातील महत्वाचा रेल्वे उड्डाणपुल सर्व वाहन वाहतुकीसाठी बंद असल्याने आज गणरायाच्या आगमनाच्या दिवशी भाविकांना चांगलाच त्रास सहन करावा लागला. त्यातच डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेसमोरील जुनी चौफुली अनेक वर्षांपासून बंद असल्याने वाहतुकीवरील ताण आणखी वाढला. ही चौफुली सुरु करण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली असून प्रशासनावर नाराजी व्यक्त करण्यात आली.

रेल्वे उड्डाणपुल बंद असल्याने हमालपुरा, काँग्रेसनगर, बसस्थानक, रेल्वे स्थानकातून राजकमल चौकाकडे जाणाऱ्या नागरिकांना मालवीय चौकातून मोठा वळसा घ्यावा लागला. त्याचप्रमाणे राजकमल, जयस्तंभ, गांधी चौक, श्याम चौक परिसरातील रहिवाशांना सायंस्कोर, बसस्थानक किंवा इर्वीन चौकातून फेरफटका मारावा लागला.




नागरिकांचे म्हणणे आहे की, उड्डाणपुल बंद असताना ही चौफुली सुरु असती तर वाहतुकीवरील ताण कमी झाला असता. परंतु ही चौफुली अनेक वर्षांपासून बंद असल्याने वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.वाहनचालकांना रेल्वे स्थानकावरून इर्वीन चौकाकडे जाण्यासाठी मालवीय चौकातूनच वळसा घ्यावा लागतो. तर मालवीय चौकातून रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्यांना देखील बंद चौफुलीमुळे इर्वीन चौक मार्गे फिरावे लागत आहे.

सणासुदीच्या काळात ही चौफुली सुरु केल्यास वाहतुकीचा तिढा मोठ्या प्रमाणात सुटेल, अशी ठाम मागणी आज दिवसभर नागरिकांकडून करण्यात आली. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अन्यथा संताप आणखी उफाळून येईल, असा इशाराही देण्यात आला.

# धारणी नगरीत पावसाच्या सरींमध्येही गणेशभक्तांचा उत्साह उचंबळला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८धारणी,** आकाशातून कोसळणारा अखंड पाऊसही धारणीकरांच्या भक्ती-उत्साहाला अडवू शकला नाही. विघ्नहर्ता गणरायाच्या आगमनाने शहराचे वातावरण भक्तिरसात न्हाऊन निघाले. सकाळपासून सुरू असलेल्या सततधार पावसातही भाविकांची लगबग, जयघोष, आनंदोत्सव आणि मंगलमूर्तीचे स्वागत पाहून संपूर्ण नगरी बाप्पामय झाली.

गणपती बाप्पांना घरी आणण्यासाठी प्रत्येकजण उत्सुकतेने तयारीत गुंतलेला होता. गुलाल, अबीर उधळत, भगव्या ध्वजांच्या लहरीत आणि झगमगत्या रोषणाईत संपूर्ण धारणी सजली. ढोल-ताशे, नगारे, डीजेचा दणदणाट आणि पारंपरिक वाद्यांच्या सुरात गणरायाच्या मिरवणुकीने शहराचा प्रत्येक कोपरा दुमदुमला.घराघरात तोरणांच्या माळा, फुलांची आरास व आकर्षक सजावट करून बाप्पाचे स्वागत करण्यात आले. प्राणप्रतिष्ठेच्या मंगलक्षणांनी भक्ती व उत्साहाचे वेगळेच वातावरण निर्माण झाले. पावसाच्या सरींनी शहर भिजले, तरी गणेशभक्तांचा आनंद अधिकच उचंबळून आला.



धारणी तालुक्यातील १५३ गावांपैकी तब्बल १३० गावांत 'एक गाव एक गणपती' संकल्पनेनुसार ग्रामस्थांनी एकत्र येऊन बाप्पाची स्थापना केली. ग्रामीण भागातही भक्तिभावाने विघ्नहर्त्याचे स्वागत करण्यात आले.शहरातील प्रमुख चौकात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आकर्षक देखावे, सजावट व रोषणाईसह मंगलमूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. 'सीया के राम' गणेश मंडळ (होली चौक), 'मेलघाटचा राजा' (रंगभवन मैदान), नेहरू नगर नवयुवक मंडळ, गजानन महाराज मंदिर ट्रस्ट, भावसार मोहल्ला सार्वजनिक गणेश मंडळ, संतोषी माता मंदिर मंडळ आदी संस्थांनी नेत्रदीपक मूर्ती व सजावट उभारून भक्तांचे मन जिंकले आहे.विशेष म्हणजे, लंबोदर बाप्पांच्या भव्य प्रतिमांनी भक्तांना आकर्षित केले असून दर्शनासाठी नागरिकांची गर्दी उसळली आहे.यंदाच्या गणेशोत्सवात पारंपरिकतेसोबत आधुनिकतेचा देखील संगम अनुभवायला मिळत असून, विविध सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांनी उत्सवाचे रंग अधिक खुलणार आहेत. हा उत्सव धारणीकरांसाठी अध्यात्म, श्रद्धा, उत्साह आणि एकतेचा खरा मेळावा ठरत आहे.

# स्व.अमन सावरकर चा अपघात करणारी गाडी व चालकाला अटक

## सक्त कारवाई करण्याकरिता शिक्षक संघटना शिष्टमंडळ ठाणेदारांना भेटले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८दर्यापूर:-** जिल्हा परिषद शिक्षक श्री राजेंद्र सावरकर व शिक्षिका सौ. कल्पना सावरकर(इंगळे) यांचा अठरा वर्षाचा मुलाचा स्व.अमन अकोला वरून येताना रामतीर्थ जवळ एका बोलेरोपिकपने त्याला उडवून निघुन गेली. त्यामध्ये अमनचा जागेवरच मृत्यू झाला होता.



या घटनेला पाच दिवस उलटून झाले असतांना सावरकर कुटुंबातील नातेवाईकांनी व शिक्षक संघटनेच्या पदाधिकारी, येवदा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांनी पेट्रोल पंप, हॉटेल, इत्यादीचे सीसीटीव्ही फुटेज मिळवून अपघात करणाऱ्या गाडीचा शोध लावला व गाडीसह चालक आरोपीला अटक केली. यावेळी सावरकर कुटुंबातील नातेवाईक व त्यांच्या शेजारील व्यक्ती यांना घेऊन शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, शिक्षक सहकारी बँकेचे संचालक तथा शिक्षक समितीचे अध्यक्ष तुळशीदास धांडे, अखिल भारतीय शिक्षक संघाचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय साखरे, संजय नागे, दिगंबर जामणीक, विष्णू राठोड, कैलास डहाळे, इत्यादी शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी येवदा पोलीस स्टेशन गाठून ठाणेदार गाडेकर यांच्यासोबत चर्चा करुन आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी ठाणेदार गाडेकर तथा बीट जमादार प्रवीण वानखडे यांनी अपघात करणारी गाडी ताब्यात घेतली असून आरोपी चालक सुद्धा अटकेत असल्याचे सांगितले. तसेच सर्व पुरावे गोळा करून आरोपींवर कडक व सक्त गुन्हे दाखल करण्याचे आश्वासन शिक्षक संघटना शिष्टमंडळाला दिले. झालेल्या घटनेमुळे सर्व शिक्षक व सावरकर कुटुंबामध्ये असंतोषाचे वातावरण असून आता येवदा पोलीस स्टेशन आरोपींना कशा प्रकारे पिंजऱ्यात उभं करते. याकडे सर्व शिक्षक संघटना व सावरकर कुटुंब यांचे लक्ष लागले आहे.

# नांदगाव पेठ येथे तीन युवकांवर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला

## बस स्टॅन्डवरील घटनेने परिसरात दहशत

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८नांदगावपेठ -** दुचाकीचा धक्का लागण्यावरून झालेल्या कीरकोळ वादाचे रुपांतर हिंसाचारात होत तीन तरुणांवर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना गणेश चतुर्थीच्या पूर्वसंध्येला म्हणजेच मंगळवारी (दि. २६ ऑगस्ट) रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास नांदगांव पेठ बस स्टॅन्ड वरील मंगलमूर्ती पान सेंटर जवळ घडली.लोखंडी रॉड आणि चाकू सारख्या घातक शस्त्राचा वापर करून जीवे मारण्याचा सुनियोजित कट रचल्याचा आरोप घटनेतील जखमींनी केला आहे. फिर्यादी ऋतिक राजेंद्र नाईकवाड (वय २४, रा. इतवारा पुरा, नांदगावपेठ) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारी म्हटले आहे की,ऋतिक व त्यांचा मित्र राहुल सुंदरकर (वय २९) हे कामानिमित्त रात्री नऊ वाजताच्या दरम्यान नांदगाव येथील काशिनाथ महाराज संस्थानकडे जात होते. त्यावेळी आरोपी कृष्णा गणेश चुडे (वय २२, रा. नांदगावपेठ) हा युवक दुचाकीने तेथून जात असतांना ऋतिक नाईकवाड याला दुचाकीचा कट लागला. त्यावरून त्यांच्यामध्ये किरकोळ वाद झाला.नागरिकांनी मध्यस्थी करून वाद मिटवला मात्र काही वेळाने राहुल सुंदरकर याला कृष्णा चुडे याने फोन करून बस स्टॅन्ड वर बोलावले.त्यावेळी ऋत्विक,राहुल, ऋषिकेश आमले आणि अमोल चुडे हे चारही जण मंगलमूर्ती पान सेंटर जवळ पोहचले मात्र त्याठिकाणी असलेल्या रोहित संदीप अमृते, कृष्णा चुडे व अन्य दोन युवकांनी लोखंडी रॉड आणि चाकूने तिघांवर प्राणघातक हल्ला चढविला. रोहित अमृते व कृष्णा चुडे यांनी लोखंडी रॉड ने ऋत्विक च्या हातावर मारहाण केली तर अनोळखी दोन युवकांनी खिशातून चाकू काढून अमोल चुडे याच्या पोटावर व ऋषिकेश आमले यांच्या पार्श्वभागावर हल्ला करून गंभीर जखमी केले व हल्लेखोरांनी तात्काळ घटनास्थळावरून पोबारा केला.घटनेची माहिती मिळताच नांदगावपेठ पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले.व जखमींना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी रोहित संदिप अमृते व कृष्णा गणेश चुडे यांच्या विरोधात भा.दं.वि. कलम ३०७, ३४ कलमान्वये तसेच हत्यार कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिस आरोपींचा शोध घेत असून या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# मेहुण्यासह तिघांना अटक

## अतुल पुरी पत्नीचा छळ करीत असल्याने दिली हत्येची सुपारी

### एक आरोपी अद्याप पसार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती :** १८बडनेरा जुनीवस्ती परिसरात गत २२ ऑगस्ट रोजी अतुल पुरी या महाविद्यालयीन कर्मचाऱ्याची हत्या झाली होती. त्याप्रकरणी गुन्हे शाखेने आणखी तीन आरोपींना अटक केली असून, यामध्ये अतुल पुरी यांच्या मेहूण्यानेच त्यांच्या हत्येची सुपारी दिली असल्याचे निष्पन्न झाले आहे. दरम्यान, याप्रकरणी आतापर्यंत एकूण पाच आरोपींना अटक झाली असून, त्यांना मदत करणाऱ्या तीन अल्पवयीन मुलांनाही ताब्यात घेण्यात आले आहे. राहुल भगवंत पुरी (३६) रा. माणीकवाडा धनज जि. यवतमाळ, प्रशांत भाष्कर वऱ्हाडे (४२) रा. माणीकवाडा धनज (ह. मु. पार्वतीनगर अमरावती) व गौरव गजानन कांवे (२९) रा. राठीनगर अमरावती अशी अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींची, तर अक्षय प्रदीप शिंपी (३०) रा. गणेडीवाल ले-आउट कॅम्प असे पसार असलेल्या आरोपीचे नाव आहे. यातील आरोपी राहुल पुरी हा मृतक अतूल पुरी यांचा साठा आहे. मागील काही वर्षांपासून अतुल पुरी हा



त्याच्या पत्नीला शारीरीक व मानसिक त्रास देत असल्याने राहुल पुरीचा अतुल पुरीवर राग होता. बहिणीवरील अत्याचाराचा बदला घेण्यासाठी राहुलनेच अतुलच्या हत्येचा कट रचला. त्यासाठी त्याने प्रशांत वऱ्हाडे याच्या मदतीने अक्षय शिंपीला हत्येची सुपारी दिली. अक्षय शिपी व त्याचा मित्र गौरव कांबे यांनी त्यासाठी ५ लाख रुपये रोख रक्कम घेतली. त्यानंतर अक्षय व गौरवने यापूर्वीच अटक असलेल्या आरोपींना त्यातील २ लाख रूपये देऊन अतुलची हत्या करण्यास सांगितल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. गुन्हे शाखेचे पथक अक्षय शिंपीच्या मागावर असून, अटक झालेल्या तीन आरोपींना पुढील कार्यवाहीसाठी बडनेरा पोलिसांच्या ताब्यात देण्यातआले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, रमेश धुमाळ, साहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाई पथकात साहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल कडू, मनीष वाकोडे, महेश इंगोले, अनिकेत कासार, पोलीस कर्मचारी सुनील लासूरकर, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, फिरोज खान, सतीश देशमुख, आस्तीक देशमुख, मनोज ठोसर, जहीर शेख, सचिन बहाळे, संग्राम भोजने, मंगेश शिंदे, अतुल संभे, नईम बेग, विकास गुडघे, नाझीमोददीन, विशाल वाकपांजर, राहुल देंगेकर, राजोक रायलीवाले, रंजीत गावंडे, सुरज चव्हाण, निलेश वंजारी, संदीप खंडारे, राहुल दुधे, चेतन शर्मा, अलोमोददीन खतीब यांचा समावेश होता.

# नगर परिषदेची घनकचरा संकलन व्यवस्था ठप्प

## कचरा उचलण्यासाठी ट्रॅक्टर येत नसल्याची नागरिकांची तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अचलपूर-** शहरातील नगर परिषदेची घनकचरा संकलन व्यवस्था पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरभर जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले असून त्यामुळे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कचरा उचलण्यासाठी नगरपरिषदेकडून पाठविण्यात येणारे ट्रॅक्टर तक्रार किंवा सूचना दिल्याशिवाय येत नाहीत. नाल्यातील काढलेला गाळ व कचरा उचलला जात नसल्याने परिसरात अस्वच्छता पसरली आहे.

गेल्या काही दिवसांपासून अचलपूर-परतवाडा शहरातील अनेक भागांत घनकचरा व्यवस्थापन कोलमडले आहे. बुधवारपासून काही भागात कचरा तसाच पडून आहे, तर काही ठिकाणी कचऱ्याच्या ढिगावर झाडे उगवू लागली आहेत. परिणामी,परिसरात दुर्गंधी पसरून नागरिकांच्या



आरोग्यावर परिणाम होण्याची भीती निर्माण झाली आहे.प्रभाग क्रमांक १० बेगमपुरा, माळीपुरा या भागातील नाल्यांचा गाळ काढल्यानंतर तो गेल्या आठवड्यापासून न उचलल्याने तसाच पडून आहे. स्थानिकांनीनगरपरिषदेच्या अचलपूर कार्यालयात तसेच परतवाडा येथील मुख्य कार्यालयात तक्रारी केल्या, फोनवर कळविले, तरीही प्रशासनाने कोणतीही कारवाई केली नाही. नगरपरिषद अधिकाऱ्यांनीही कचरा उचलण्यासाठी गेल्या सहा-सात दिवसांपासून ट्रॅक्टर ट्रॉली न आल्याचे मान्य केले आहे.दररोज प्रत्येक प्रभागात कचरा संकलन होणे आणि नाल्यांची सफाई झाल्यानंतर त्याच दिवशी गाळ उचलला जाणे अपेक्षित आहे. परंतु सध्या आठ-आठ दिवस कचरा तसाच पडून आहे. यामुळे स्थानिक नागरिकांकडून संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.संजय शेटे, बेगमपुरा यांचे म्हणणे आहे, आमच्या प्रभागात गेल्या आठ दिवसांपासून नाल्यातील गाळ काढल्यानंतर तो उचलण्यासाठी ट्रॅक्टर आलेले नाहीत. नगर परिषदेत तक्रार दिली, पण काही झाले नाही. वार्ड जमादार महिनोंमहिने येत नाहीत. तक्रार किंवा सूचना दिल्याशिवाय सफाई होत नाही. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. अशी मागणी होत आहे.

# सणासुदीच्या काळातही विजाभज आश्रमशाळा कर्मचारी वेतनापासून वंचित

## आमदार सुधाकर अडबाले यांचे प्रधान सचिवांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती :** राज्यातील आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे माहे जुलै व ऑगस्टचे वेतन अजूनही झालेले नाहीत. सणासुदीचे दिवस असल्यामुळे शासनाने माहे ऑगस्टचे वेतन गणेश चतुर्थीपूर्वी करण्याचे आदेश काढलेले असतांना अपुऱ्या तरतुदीमुळे संपूर्ण राज्यातील विजाभज आश्रमशाळा कर्मचाऱ्यांचे जुलैचेच वेतन झालेले नाही त्यामुळे शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष आहे. माहे जुलै व ऑगस्टच्या वेतना साठी भरीव तरतूद उपलब्ध करून देण्या



बाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी इतर मागास बहुजन कल्याण व वित्त विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र लिहून मागणी केली आहे.इतर कर्मचाऱ्यांच्या तुलनेत आश्रमशाळांचे वेतन हे नेहमीच एक ते दोन महिने उशिराने होत असते. दोन महिन्या पासून वेतन मिळाले नसल्याने कर्मचाऱ्यांची गृह कर्जे, वाहनकर्जे, एलआयसीचे हप्ते व बँकांच्या इतर कर्जांचे हप्ते यावर बँकांना अतिरिक्त व्याजाचा भरणा करावा लागतो. सणासुदीचे दिवस असूनही असेच पगार उशिरा होत राहिले तर बँका कर्मचाऱ्यांच्या एकाच महिन्याचे पगारातून दोन दोन कर्जाचे हप्ते कपात करतात परिणामी कर्मचाऱ्यांच्या हातात दमडीही शिल्लक राहत नाही. त्यामुळे आश्रमशाळा कर्मचारी सतत आर्थिक विवंचनेत असतो. सणासुदीचे दिवस असल्यामुळे जुलै व आगष्टचे वेतन अनुदान तात्काळ उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शिक्षक आमदार सुधाकर अडबाले यांनी केलेली असून सर्व कर्मचारी वेतनाच्या प्रतीक्षेत आहेत.

# नवनियुक्त सचिवाखाली काम करण्याच्या आदेशाला स्थगिती

## हायकोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय दीपक विजयकर पदावर कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती :**बॉम्बे हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती अधिनियम १९६३ मधील कलम ३५-अ अंतर्गत अमरावती बाजार समितीमधील नवनियुक्त सचिवाखाली नियमितपणे नियुक्त सचिवास काम करण्याचे निर्देश दिल्याबाबतचा आदेश स्थगित केला आहे. त्यामुळे बाजार समितीचे सचिव दीपक विजयकर हे तूर्तास पदावर कायम आहेत.

आ. संजय खोडके यांनी विधिमंडळात उपस्थित केलेल्या मुद्यावरून १४ ऑगस्ट रोजी राज्य सरकारकडून आदेश जारी करण्यात आला होता. या आदेशामध्ये नियमितपणे नियुक्त केलेल्या सचिव दीपक विजयकर 'यांना नव्याने नियुक्त केलेले सचिव साहाय्यक निबंधक स्वाती गुडधे यांच्या अधीन राहून कामकरण्याचे निर्देश देण्यात आले होते. यावरून याचिकाकत्यांनी हायकोर्टात दाद मागितली. वरिष्ठ वकील एम. जी. भंगाडे यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, सचिव या पदाच्या जबाबदाऱ्या व अधिकार नियम निश्चित आहेत. नियमित सचिवाला नवनियुक्त सचिवाखाली काम करण्याचे बंधन घालणे हा अधिकारकपात करणारा निर्णय आहे. त्यामुळे नियमित सचिवाच्या अधिकारांवर गदा आणण्यासाठी असे आदेश देता येत नाहीत. दोन सचिवांची नेमणूक करण्याची तरतूद अधिनियमात नाही. कायदेशीर प्रक्रिया न पाळता नियमित सचिवाला नवनियुक्त सचिवा खाली काम करण्यास भाग पाडणे योग्य नाही. असे निरिक्षण न्यायालयाने नोंदविले आहे. त्यामुळे, न्यायालयाने १४ ऑगस्ट रोजीचा आदेश स्थगित केला असून राज्य सरकारला चार आठवड्यांत यावर उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत.

पुढील सुनावणी चार आठवड्यांनंतर होणार आहे. बाजार समितीच्या राजकीय वादात मात्र सचिवांची चांगलीच दमछाक होत असल्याने या प्रकरणाकडे आता सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# वंचित बहुजन आघाडी ठोकणार दर्यापूर नगरपालिकेला कुलूप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२७दर्यापूर** शहरामध्ये पथदिवे, नाल्या, रस्ते, भाग्योदय मंगल कार्यालय आठवडी बाजारातील कचऱ्याचे ढिगारे, हड्वाढ साईनगर, पृथ्वीराज नगर, जयेश मोटरच्या मागे व इतर ठिकाणी रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यामध्ये फक्त नगरपरिषदेने मुरूम टाकावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने ३० जुलैला पत्राद्वारे केली होती.

या मागणीला नगर परिषदेने केराची टोपली दाखवली. त्यानंतर पुन्हा २४ ऑगस्टला नगरपरिषदेला स्मरण पत्र देण्यात आले. परंतु, नगरपरिषद शहरातील विकासाची कामे करण्यात फारशी कार्यतत्पर नसल्याने वंचित बहुजन आघाडी शुक्रवारी २९ ऑगस्टला दुपारी १ वाजता नगरपरिषद कार्यालयास कुलूप ठोको आंदोलन करणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष संजय चौरपगार यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

# चांदूररेल्वे तालुक्यात २५ सार्वजनिक गणपती बाप्पांची प्रतिष्ठापनातीन गाव मिळून एक गणपती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदुर रेल्वे**

चांदूर रेल्वे शहर व तालुक्यात मोठ्या भक्तीभावाने भजने व ढोल-ताशे, डीजेच्या गजरात गणपत्ती बाप्पाचे आगमन झाले असून अनेक भाविक भक्तांनी घरी श्री गणेशाची स्थापना केली आहे. चांदूररेल्वे शहरात ७, तर तालुक्यात १८ गावांत सार्वजनिक मंडळाच्यावतीने श्री गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे.गणपती बाप्पाच्या आगमनाच्या निमित्ताने सकाळपासूनच सर्व भाविकांनी आकर्षक आणि सुंदर पद्धतीने मंडळे सजवली होती. या सर्व मंडळांमध्ये विधी आणि मंत्रोच्चारात भगवान गणेशाच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून चांदूररेल्वे शहरात असलेल्या ७आणि ग्रामीण भागात असलेल्या १८ सार्वजनिक मंडपांमध्ये गणपती



बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरू आहे. महाराष्ट्रात हा गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो, ज्यामध्ये गणेश चतुर्थीच्या दिवशी विधिवत पूजा केल्यानंतर बाप्पा भक्तांच्या घरांसह सार्वजनिक मंडपात येतात. सकाळपासून उत्साही वातावरणात भाविकांनी बाप्पाला घरी आणले. त्यांची व्यवस्थित प्रतिष्ठापना केली आणि पूजा-अर्चना केल्यानंतर सकाळ-संध्याकाळ आरती केली आणि त्यांचे आशीर्वाद घेतले. शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राहण्याकरिता जागोजागी पोलिस, होमगार्ड बंदोबस्त तैनात आहे. सणासुदीच्या दिवसापुध्ये बाजारपेठांमध्ये चैतन्य आले आहे. पोळा, काजळ तीज, गौरी-गणेश स्थापनेसाठी भाविक उत्साही दिसत आहेत. त्याचप्रमाणे बाजारात खरेदीदारांची गर्दी पाहून व्यापारीही आनंदी दिसत आहेत. या सणांमध्ये, रोषणाई,सजावटीचे साहित्य, फळे, फुले, सुगंधित अगरबत्ती, प्रसाद यांची दुकाने ग्राहकांनी फुलून गेली आहे.

**१० गावांत 'एक गाव –एक गणपती**

चांदूर रेल्वे पोलिस स्टेशन हद्दीत १० गावांत 'एक गाव एक गणपती' ही संकल्पना राबविण्यात येत आहे, तर मांजरी, म्हसला व रहिमापूर हे तीन गांव मिळून एक गणपती बसविण्यात आला आहे.

# चांदूरबाजार येथे ३० रोजी शालेय साहित्य वाटप

## शिक्षक सहविचार सभेत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिति

## भाजप शिक्षक आघाडी व शिक्षक महासंघाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदूरबाजार**

भाजप शिक्षक आघाडी व शिक्षक महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या ३० ऑगस्ट रोजी चांदूरबाजार येथे डिजिटल क्लासरूम साहित्य वाटप व शिक्षक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती कार्यक्रमाचे आयोजक शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी दिली. चांदूरबाजार शहरातील गो. सी. टोम्पे महाविद्यालयातील संत नामदेव महाराज सांस्कृतिक सभागृह येथे शनिवार दिनांक ३० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे महसूल मंत्री व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहणार आहे. गो सी टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्टचे अध्यक्ष भास्करदादा टोम्पे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला माजी खासदार नवनीत राणा, अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे, मेळघाटचे आमदार केवलराम काळे, बियाणे महामंडळाचे अध्यक्ष प्रमोददादा कोरडे, माजी आमदार सुधाकरराव कोहळे ,माजी शिक्षक आमदार वसंतराव खोटरे ,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष





सुरेखाताई ठाकरे, भाजप जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, अशोकराव बनसोड , भाजप उपाध्यक्ष छायाताई दंडाळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सोबतच भाजप नेते विलास तायवाडे, भाजपचे चांदूरबाजार तालुकाध्यक्ष रमेश तायवाडे, जिल्हा उपाध्यक्ष मुरली माकोडे, विशाल काकड, कुंदन यादव, शंकर मालखेडे माजी शिक्षण सभापती आनंद अहिर मोहम्मद मुजाहिद अहमद खान,भाजप शिक्षक आघाडीचे अमरावती जिल्हाध्यक्ष पद्माकर घोगरे, हर्षल धुळे, मुख्याध्यापक अमोल ठाकरे, गाजी जोहोरोस सर, शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष मनोज कडू ,जिल्हा उपाध्यक्ष पी आर ठाकरे,कार्याध्यक्ष गजाननराव देशमुख ,भाजप शिक्षक आघाडीचे शहर अध्यक्ष सुधीर जोशी, शिक्षक महासंघाचे सचिव मोहन ढोके, प्राचार्य डॉ. आर एस रामटेके, मुख्याध्यापक वसंत वाघ ,शिक्षक महासंघ उर्दू सेल जिल्हाध्यक्ष शहीद खान,कोषाध्यक्ष सुधाकरराव गावंडे, प्रसिद्धीप्रमुख अजय बीसेन ,प्राचार्य मोहन पांडे, जिल्हा संघटक सुशील चौधरी आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती राहणार आहे. डिजिटल क्लासरूम साहित्य वाटप व शिक्षक सह विचार सभेला चांदूरबाजार, अचलपूर,धारणी, चिखलदरा, अंजनगाव सुर्जी या तालुक्यातील शिक्षक बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर, मनोज तायवाडे, संदीप होले, जयंत तुरखडे, पंकज बाजड, अरविंद घोम ,निलेश वीरखडे ,संतोष भोरे, प्रमोद मोरे, दिलीप बोबडे ,पंजाबराव चौधरी,पी एन ठाकरे,सचिन बोंडे आदी पदाधिकाऱ्यांनी केले आहे .

**एक कोटीच्या डिजिटल क्लासरूम साहित्याचे होणार वाटप :**

भोयर शिक्षण क्षेत्रामध्ये तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर व्हावा आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधांचा लाभ व्हावा या मुख्य उद्देशाने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून तब्बल एक कोटी रुपये किमतीच्या डिजिटल क्लासरूम साहित्याचे वाटप त्यांच्याच हस्ते अचलपूर व चांदूरबाजार तालुक्यातील शाळांना करण्यात येणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे आयोजक चंद्रशेखर भोयर यांनी दिली. तसेच या कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात येणार असून अचलपूर ,चांदूरबाजार, अंजनगाव सुर्जी, धारणी, चिखलदरा या तालुक्यातील शिक्षकांची सहविचार सभा महसूल मंत्री बावनकुळे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या सभेत शिक्षकांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात येणार असल्याचे भोयर यांनी सांगितले.

# तपासणीच्या नावाखाली डॉक्टरचा अश्लील कारनामा; डॉ.गोरडे यांच्यावर गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शहरातील खोलापुरीगेट पोलिसस्टेशन हद्दीतील पार्वती नगर येथील एका डॉक्टरने तपासणीच्या नावाखाली एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीशी अश्लील कृत्य करून अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याबद्दल अटक करण्यात आली आहे.

पार्वतीनगरमधील संकटमोचन हनुमान मंदिराजवळ मोरया क्लिनिकया नावाने दवाखाना चालवणारे आरोपी डॉ. सागर अशोकराव गोरडे (३३) श्री दर्शन कॉलनी, घनश्याम नगर, सातुर्णा यांच्याविरुद्ध एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीने खोलापुरीगेट पोलिसस्टेशनमध्ये दिलेल्यातक्रारीनुसार, २६



ऑगस्ट रोजी संध्याकाळी ६:१५ वाजण्याच्या सुमारास तिची तब्येत ठीक नव्हती. त्यामुळे ती डॉ. गोरडे यांच्याकडे उपचारासाठी गेली. यादरम्यान, डॉ. गोरडे यांनी तिला रक्तदाब तपासण्याच्या नावाखाली आतील खोलीत बोलावले आणि स्टेथोस्कोप न वापरता चुकीच्या हेतूने तिच्या शरीराला हात लावण्यास सुरुवात केली. यादरम्यान, अल्पवयीन मुलीने उठण्याचा प्रयत्न केला. तेव्हा डॉ. सागर गोरडे यांनी तिला चेकअप बेडवरून उठण्यापासून रोखले. जर तिने उठण्याचा प्रयत्न केला तर तिला रुग्णालयात बोलावलेजाईल, असेही त्यांनी सांगितले.

जर बरे वाटत असेल, तर त्याने उद्या पुन्हा यावे. यामुळे अल्पवयीन मुलगी घाबरली आणि तिने घरी येऊन तिच्या आईला संपूर्ण घटना सांगितली.त्यानंतर अल्पवयीन मुलगी तिच्या आईसह खोलापुरीगेट पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यासाठी पोहोचली. अल्पवयीन मुलीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे, खोलापुरी गेट पोलिसांनी बीएनएसच्या कलम ७४ आणि पोक्सो कायद्याच्या कलम ८ आणि १२ अंतर्गत गुन्हा दाखल केला आणि अल्पवयीन मुलीच्या छेडछाडीप्रकरणी डॉ. सागर गोरडे यांना अटक केली.

# भातकुली तहसील कार्यालयात दलालांचा सुळसुळाट

## रेशनकार्ड नूतनीकरणाचे घेतात हजारो रुपये

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

भातकुली तालुक्याचे तहसील कार्यालय जेव्हापासून भातकुली शहरामध्ये स्थानांतरित करण्यात आले तेव्हापासून भातकुली तहसील कार्यालयामध्ये दलालांचा मोठा सुळसुळाट निर्माण झाला आहे. तहसीलच्या प्रमुख द्वारावरच अनेक दलाल तहसीलमध्ये कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना विद्यारपूस करून आपल्या जाळ्यात ओढत असल्याचे प्रकार सध्या मोठ्या प्रमाणात भातकुली तहसीलच्या परिसरात दिसून




येत आहे.

भातकुली तहसीलचे कार्यालय गणोजा देवी मार्गावर असून या ठिकाणी असणाऱ्या कार्यालयाच्या परिसरामध्ये अनेक दलाल आपले साहित्य घेऊन या परिसरात किरकोळ कामासाठी येणारे नागरिक सांगावयाचे झाल्यास रेशन कार्ड,उत्पनाचे दाखले,जातीचे प्रमाणपत्र,१००रु च्या स्टॅम्प पेपरवर शपथ पत्र,व काही किरकोळ कामे

तक्रारीसंदर्भात कामानिमित्त या ठिकाणी आले असताना त्या नागरिकांवर हे दलाल तुटून पडतात आणि हजारों रुपये किरकोळ त्यांच्याकडून उकळतात या संदर्भात अनेक तक्रारी सध्या प्राप्त झाल्या आहेत.यामध्ये तहसील कार्यालयातील अनेक कर्मचारीसुद्धा सामील असून त्यांचासुद्धा वाटा असल्याचे नागरिकांच्या म्हणण्यावरून दिसून येते मिळालेल्या पैशांमध्ये अर्थ आम्ही अर्थ तुम्ही अशी भूमिका असून त्यामुळे असून त्यामुळे सोप्या पद्धतीचे असणारे कामसुद्धा कामसुद्धा पैसे घेतल्याशिवाय या कार्यालयात होल नाही. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांकडून फक्त पैसे उकजण्याचा एकमेव दामोधा प्रमाणात सुरु असल्यामुळे भातकुली तहसीलो तहसीलदार अजितकुमार येळे यानी याकडे लक्ष देऊन या दलालांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# 'पीएम आवास' मध्ये १.११ लाख लाभार्थी वाढले! जिल्ह्यात सर्वेक्षण पूर्ण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती पीएम आवासमध्ये जिल्ह्याच्या यादी १ लाख ११ हजार १४१ लाभार्थ्यांची भर पडली आहे. गत चार महिन्यांपासून सुरु असलेले सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता ज्या लाभार्थ्यांना मोबाईलव्दारे सर्वेक्षण केले, त्यांची पडताळणी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यांमार्फत सुरू करण्यात आली आहे.

जिल्ह्यात घरकुल मिळण्याकरिता २०१८ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले होते.यात मोठ्या प्रमाणात लाभार्थी समाविष्ट झाले असले तरी बहुतांश लाभार्थी पात्र असताना सुटल्याचीदेखील ओरड झाली.कित्येक दरम्यान, लाभार्थ्यांनी घरकुलाकरिता मागणी केला. परंतु त्यांचे नाव यादीत नसल्याने त्यांना घरकुल देणे प्रशासनाकडून अशक्य होते. त्यामुळे वंचित लाभाध्यर्थ्यांमध्ये रोष व्यक्त होत असताना शासनाकडून यादीतून लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता सुटलेल्या अशा पात्र लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करून त्यांना यादीत समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू होती. एप्रिल ते जुलै या चार महिन्यांत १ लाख ११ हजार १४१ यामध्ये सर्वेक्षण पूर्ण झाले आहेत ३९.३०१स्वयंसर्वेक्षण, तर ७१.८४० साहाय्यित सर्वेक्षणांचा समावेश आहे. सर्वाधिक सर्वेक्षण धारणी तालुक्यात पार पहले असून येथे एकूण १२.०३४ सर्वेक्षण करण्यात आले. त्यापाठोपाठ चांदूरबाजार (१०.१५७) व धामणगाव रेल्वे (१.४९६) या तालुक्यांचा समावेश आहे.दरम्यान, भातकुली (८,७३३), दर्यापूर(८,९४५) अचलपूर(९,३०७) तालुक्यांमध्येदेखीलसर्वेक्षणाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. अमरावती तालुक्यात ८,०२५, तर अंजनगाव सुर्जीत ७.७१४ लाभार्थी वाढले आहेत. यामध्ये ३९ हजार २०१ लाभार्थ्यांनी स्वतः मोबइव्दारे सर्वेक्षण केले आहे.त्यांच्या तपासणीकरिता चेकरची नियुक्ती केली असून आतापर्यंत यामधून ६७६ जणांची पडताळणी करण्यात या आली आहे.

# आभाळीचा हुंदका हा दाटूनिया आला, शेगावीचा राणा आज समाधीस्थ झाला

## संतनगरीत हजारो भाविकांचा मेळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८शेगाव**

विदर्भ पंढरी शेगाव नगरी येथे संत गजानन महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज गुरुवारी, २८ ऑगस्ट रोजी हजारो भाविकांची मांदियाळी जमली असून जिल्ह्यासह राज्यातील कमी अधिक ४५० दिंड्या दाखल झाल्या आहे. यामुळे शेगाव नगरी आबाल वृद्ध भाविकांनी गजबजली असून 'गण गण गणात बोते' च्या गजराने दुमदुमली आहे. विशेष सजावट करण्यात संत गजानन महाराज संस्थांनचे मंदिर, अजूनही होणारे दिंड्यांचे आगमन, समाधी स्थळी नतमस्तक होण्यासाठी लागलेल्या भाविकांच्या दीर्घ रांगा, भक्तांनी गजबजलेले लहान मोठे मार्ग,भगवे ध्वज व पताका यामुळे शेगाव नगरीचा आजचा थाट वेगळाच आहे.

त्याला निमित्त देखील खास आहे.आज ऋषींपंचमी असून याच पावन मुहूर्तावर महाराजांनी संजीवन समाधी



घेतली होती. आज २८ ऑगस्ट रोजी श्रींचा पुण्यतिथी उत्सव सोहळा भक्तिमय वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा होत आहे. त्याच आज श्रीं चा वार असलेला गुरुवार आल्याने भाविकांची जास्तच गर्दी उसळली आहे.

या सोहळ्यासाठी संतनगरी सज्ज झाली आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून जवळपास ४५० च्यावर भजनी दिंड्या काल बुधवार सायंकाळी उशिरा पर्यंत संत नगरीत दाखल झाल्या होत्या. दूरवरच्या भजनी दिंड्या येण्यांचा ओघ आजही सुरु आहे. श्री संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने श्री संत गजानन महाराजांचा ११५ वा पुण्यतिथी उत्सव २४ ऑगस्ट ते २९ ऑगस्ट या कालावधीत भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज गुरुवारी सकाळी ७ ते ९ वाजेदरम्यान श्रींच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त समाधी सोहळ्यानिमित्त ह भ प भरत बुवा पाटील यांचे कीर्तन पार पडले. सकाळी १० वाजता श्री गणेशयाग व वरूणयागाची पुर्णाहूती व अवभृतस्नान पार पडले.

**रात्री राहणार मंदिर खुले**

राज्यातील हजारो भक्त श्रींच्या दर्शनासाठी शेगांव येथे दाखल होत आहे. भक्तांना लवकरात दर्शन घेता यावे, श्री संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने बुधवार, गुरुवार असे दोन दिवस श्रीचे मंदिर दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले .श्रींच्या मंदिर परिसरात व श्रींच्या समाधी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. त्याचबरोबर संपूर्ण मंदिर परिसरात केळीचे खांब व आंब्याच्या पानाचे तोरण लावण्यात आले आहेत व सर्वत्र मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे.जय गजानन श्री गजानन, ज्ञानोबा तुकाराम, नाम विठोबाचे घ्यावे पुढे पाऊल टाकावे, गण गण गणात बोते मंत्राचा नाम जप करत जय हरी विठ्ठल श्री हरी विठ्ठल असा श्रींच्या नामाचा गजर करत असंख्य भजनी दिंड्या संतनगरीत दाखल झाल्या आहे.श्रींच्या मंदिर परिसरात जाऊन श्रींचे समाधीचे व कळसाचे दर्शन करून नित्य मार्गाने जात आहेत.

# परसापुरातील ज्येष्ठांनी साधली राष्ट्रीय ग्राम एकात्मता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अचलपूर**

अचलपूर पोळा सणाच्या निमित्ताने ग्राम परसापूर येथे गोपालकृष्ण ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमप्रसंगी राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन झाले. दरवर्षी ज्येष्ठ नागरिक पोळा हा सण मोठ्या उत्साहात साजरा . करतात. याहीवर्षी संघटनेतील बहुतांश ज्येष्ठ सदस्य स्वयंस्फूर्तीने उपस्थित झाले होते. ज्येष्ठ सदस्यांना फेटे बांधल्यावर सर्वांनी वाजत गाजत मिरवणुकीने जाऊन भोलेनाथ महादेवाचे दर्शन घेतले



व पोळ्यातील बैलजोडींची सार्वजनिक पूजा करण्यात आली.

यावेळी फेस्कॉम अकोला अमरावतीचे संपर्क सचिव डॉ. रामनारायणसिंह खनवे यांच्या प्रोत्साहनाने गती मिळालेल्या या विशेष कार्यक्रमप्रसंगी भिमसिंग खनवे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या पोळा कार्यक्रमात बैलजोडींचे सन्मानपूर्ण पूजन झाल्याने उपस्थित सर्व गावकरी नागरिकांनी मनस्वी आनंद आणि समाधान व्यक्त केले. उपस्थित ज्येष्ठांचा फेट्यातील उत्साह पाहून ग्रामस्थांनी प्रशंसा केली. यामुळे राष्ट्रीय ग्राम एकात्मतेच्या दृष्टिकोनातूनसुद्धा ज्येष्ठांनी योग्य कार्यभाग साधल्याने ज्येष्ठ नागरिकांचा आत्मविश्वास व सन्मान वाढण्यास मदत झाली.ज्येष्ठांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाप्रसंगी संघटनेतीलडॉ. प्र. शि. टेहरे, प्र. श्री. हरणे, श्री. गी. ठाकूर, रूपराव घासले माजी सैनिक, नकूल खडके, भिमसिंग खनवे अध्यक्ष, विजय वाघमारे सचिव, सोनोने गुरुजी, प्र. द. नरवास, लक्ष्मण सुर्वे, मदनसिंग खनवे, दादाराव जुमळे, गेंदुसिंग खोजरे, रमेश येवले वडगाव, मनाजी भाकरे, फकिर येवले, वकीलदास गावंडे, राजेराम गावंडे, देवीदास वर्धे आदी मान्यवरांनी कार्यक्रमाची शोभा वाढविली. शेवटी नकूल खडके गुरूजी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# नागरिकांच्या आरोग्यासाठी सहाय्यभूत 'श्री गणेशा आरोग्याचा' उपक्रमाचा जिल्ह्यात आजपासून शुभारंभ

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाद्वारे समन्वयन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आणि मुख्यमंत्री सचिवालयाच्या सूचनेनुसार राज्यात सर्वत्र 'श्री गणेशा आरोग्याचा' हा विशेष उपक्रम आजपासून राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात गणेशोत्सवाच्या पर्वात आरोग्य विभाग व गणेश मंडळांच्या सहाय्याने आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.




या उपक्रमांतर्गत केवळ आरोग्य तपासणी व उपचारच नव्हे, तर मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी आणि विविध शासकीय आरोग्य योजनांची व्यापक जनजागृती आणि मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात एकत्रितपणे आयोजित होणाऱ्या या आरोग्य शिबिरांमुळे हजारो नागरिकांना थेट लाभ होणार आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्हा शल्य चिकित्सकांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले जन आरोग्य योजनेतील नोंदणीकृत रुग्णालये वेगवेगळ्या गणेश मंडळांशी समन्वय साधून आरोग्य शिबिरे आयोजित करणार आहेत.तर ग्रामीण भागात जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्रे ग्रामीण भागातील गणेश मंडळांसोबत सहभागी होत आरोग्य शिबिरे घेणार आहेत.आरोग्य शिबिरांच्या ठिकाणी शहरी आणि ग्रामीण भागात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी आणि इतर शासकीय योजनांची माहिती दर्शनी भागात प्रसारित केली जाणार आहे.धर्मादाय आयुक्त यांच्या अधिपत्याखालील धर्मादाय रुग्णालये प्रत्येकी दोन आरोग्य शिबिरे घेऊन या जनजागृती मोहिमेत सक्रिय सहभागी होणार आहेत.या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये नोंदणीकृत खाजगी रुग्णालयेही उत्स्फूर्तपणे अमरावती शहरात आरोग्य शिबिरे आयोजित करणार आहेत. विशेषतः नमूद ठरेल असे,या उपक्रमांतर्गत शहरातील सायन्स कोर मैदानावर सलग आठ दिवस चालणारे आरोग्य शिबिर हे मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत नोंदणीकृत रुग्णालयांच्या सक्रिय सहभागाने आयोजित होत आहे.जिल्ह्यात ही मोहिम जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वात राबविण्यात येणार असून निवासी उपजिल्हाधिकारी, धर्मादाय उपायुक्त, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनात उपक्रम अधिक प्रभावीपणे राबवला जाणार आहे. या आरोग्य शिबिरांचा जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# मोर्शी येथील अप्पर वर्धा धरणाचे तीन दरवाजे उघडले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

पश्चिम विदर्भातील सर्वात मोठं अप्पर वर्धा धरण आज, गुरुवारी (दि. २८) पहिल्यांदाच यंदाच्या पावसाळ्यात विसर्गासाठी उघडण्यात आलं. धरणाचे १३ पैकी तीन दरवाजे प्रत्येकी १० सेंटीमीटरने उघडण्यात आले असून त्यामधून ४८.२५ घ.मी.प्र.से.एवढा विसर्ग वर्धा नदी पात्रात सोडल्या जात आहे. तर सध्या धरणातील जलसाठा ९२ टक्क्यांवर पोहोचला आहे.दरवाजे उघडल्यामुळे धरणातील पाणी वर्धा नदीच्या पात्रात सोडण्यात आलं आहे. त्यामुळे अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर आणि वर्धा या जिल्ह्यांतील नदीकाठच्या गावांना प्रशासनाकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.अप्पर वर्धा धरणातून सुरू झालेला विसर्ग हा नियमित स्वरूपाचा असला तरी पुढील काही दिवसांमध्ये पावसाचा जोर वाढल्यास आणखी दरवाजे उघडण्याची शक्यता प्रशासनाने नाकारलेली नाही. त्यामुळे नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यंदाच्या पावसाळ्यात प्रथमच अप्पर वर्धा धरणाचे दरवाजे उघडण्यात आल्याने वर्धा नदी परिसरातील नागरिकांत उत्सुकता आणि काहीशी चिंता निर्माण झाली आहे.

### दैनिक विदर्भ प्रजासत्ताकच्या बातमीची दखल

# पशुसंवर्धन विभागांचे पथक हंतोडा गावात दाखल

## उपसरपंच यांनी दिला होता मृत जनावरे शासकीय कार्यालयात टाकण्याचा इशारा


विदर्भ प्रजासत्ताक

हंतोडा गावात लंम्पी आजाराचे थैमान

लंम्पी आजारांवर उपचार न केल्यास जनावरे शासकीय कार्यालयात सोडू

संत्यविजय उंबरकर उपसरपंच हंतोडा यांचा प्रशासनाला इशारा

दि.२७अंजनगाव सुर्जी

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हंतोडा येथे लंम्पी आजाराचे थैमान घातले असून या आजाराने हंतोडा गावातील ३० ते ४० पेक्षा जास्त जनावरांना आजाराने गाठले आहे. सध्या ... पिकांसाठी शेतकऱ्यांना कर्ज काढून पिके उभी केली असून शेतकऱ्यांजवळ पैसा नसताना या भयानक लंम्पी आजाराने थैमान घातले असल्यामुळे शेतकरी संकटात सापडला आहे. हंतोडा हे गाव विहिगाव येथील पशु संवर्धन दवाखाना अंतर्गत येत असुन हंतोडा येथे लंम्पी आजार असलेले जनावरे घेऊन जाणे शक्य होत नाही त्यामुळे पशुपालकाना खाजगी डॉक्टरांना खर्च परवडत नसल्याने अनेक आजारग्रस्त जनावरांवर उपचार झालाच नसल्यामुळे हा संसर्गजन्य आजार गावातील इतर जनावरांवर पसरत आहे.मागील वर्षी लम्पी आजाराने थैमान घातला होता. तालुक्यामध्ये यावर्षी देखील या आजाराने शिरकाव केल्याचे दिसुन येत आहे. तालुक्यात हंतोडा गावात लंम्पि सदृश्य आजार असल्याचे निदर्शनास येत असुन अनेक गुरांना आजारांनी गाठले आहे.धक्कादायक बाब म्हणजे एकिकडे साथ रोग वाढत असताना पशुवैद्यकीय अधिकारी याठिकाणी फिरकले नसल्याचा ...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हंतोडा येथे लंम्पी आजाराने थैमान घातले असून शासकीय उपचार होत नसल्याने संसर्गजन्य असलेला लंम्पी आजार गावातील इतर जनावरांवर फैलत असल्याने आजारांची संख्या वाढत असल्याच सविस्तर वृत सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक मध्ये बुधवार दि.२७रोजी प्रकाशित करण्यात आले होते.त्या वृत्ताची दखल स्थानिक पातळीवर तात्काळ घेण्यात आली व आज पशुसंवर्धन विभागाचे पथक गावात पोहचत जनावरांची तपासणी सुरु केली.



अंजनगाव सुर्जी मध्ये खाजगी डॉक्टरकडे कडे पशुपालकांना उपचार परवडत नसुन खाजगी डॉक्टर आडमाप पशुपालकांना कडून पैसे लुटत आहे. शासनाने विना मुल्य लंम्पी आजारांवर उपचार करावे अन्यथा लंम्पी आजाराने मृत पावलेले जनावरे शासकीय कार्यालयात टाकण्याचा इशारा हंतोडा येथिल उपसरपंच संत्यविजय उंबरकर यांनी प्रशासनाला दिला होता. मात्र आज सहायक आयुक्त लघु पशुवैद्यकीय अधिकारी डॉ शशिकांत कानफाडे यांच्या सह पशुसंवर्धन विभागातील चमु घेऊन तात्काळ उपचार सुरू केले आहे यावेळी डॉ शशिकांत कानफाडे विहीगाव येथील पशुवैद्यकीय अधिकारी सह हंतोडा येथिल उपसरपंच संत्यविजय उंबरकर पशुपालक उपस्थित होते.

# मोदक महागले, उत्साह तरी चवदार

## बहुरंगी स्वादाचे मोदक बाजारपेठेत उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**



गणेशोत्सवाची चाहूल लागली की बाजारपेठेत मोदकाचा सुगंध दरवळू लागतो. बाप्पाच्या आगमन बरोबरच अमरावती शहरातील मिठाईच्या दुकानांमध्ये मोदक खरेदीसाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे. दरम्यान, यंदा महागाईची झळ मोदकांनाही बसली असून पारंपरिक खसखस, खोबऱ्याचे उकडीचे तसेच काजू-किशमिश भरलेले खास मोदक विक्रीस उपलब्ध आहेत.

महिनाभरापासून घरोघरी स्वच्छता तसेच रंगरंगोटीची सुरू असलेली कामे भाविकांनी आधीच आटोपती घेतली आहेत. बाजारपेठेतही आठवडाभरापासून मोठी गजबज आहे. गणेश भक्तांनी बाप्पांची स्थापना केल्यानंतर गणपती बाप्पाचा अतिप्रिय नैवेद्य असलेल्या मोदकाला भाविक कोणत्याही परिस्थितीत प्राधान्य देताना दिसत आहेत. शहरातील मुख्य बाजारपेठ, मिठाई दुकानांत ग्राहकांची विशेष गर्दी पाहायला मिळत आहे.

मिठाईच्या दुकानात बहुरंगी फ्लेवरचे मोदक विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. त्यात खव्याचे मोदक, फ्लेवरचे मोदक, ड्रायफ्रुट मिश्रीत मोदक आदी प्रकार उपलब्ध आहेत. ज्यांची किंमत १२० रुपयापासून ते थेट २९० रुपये पाव पर्यत आहेत. पूजेसाठी मोदक खरेदी करताना ग्राहक.

यंदा विशेष आकर्षण : यावर्षी मिठाई दुकानदारांनी चॉकलेट, ड्रायफ्रूट्स, केशर व मावा मिश्रित विविध स्वादामध्ये मोदक उपलब्ध करून दिले आहेत. लहान मुलांना आकर्षित करण्यासाठी रंगीत चॉकलेट मोदक, तर आरोग्य सजग ग्राहकांसाठी शुगर-फ्री मोदकाचा ट्रेंडही वाढताना दिसतोय.

महागाईचा परिणाम मोदकांच्या किमती वाढवण्यामागे खोबरे, गूळ, साखर, तूप आणि ड्रायफ्रूटच्या वाढलेल्या दरांचा परिणाम असल्याचे दुकानदार सांगतात. बाजारात मागील वर्षीच्या तुलनेत सुमारे १० ते १५ टक्के दर वाढला आहे, तरीदेखील, भाविक गणपती बाप्पाच्या नैवेद्यासाठी खर्चाला मागेपुढे पाहायला तयार नाहीत.

# मोथा गावातील गणपती संग्रहालयः जगातील सर्वात मोठा ६ हजार मूर्तींचा नंद उद्यान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मोथा**

मोथा गावातील नंद उद्यान - गणपती संग्रहालय आता पर्यटकांचे आकर्षणस्थळ बनले आहे. येथे एकाच छताखाली तब्बल ६ हजार गणेशमूर्ती ठेवण्यात आल्या आहेत. जगात एकमेव असलेले हे संग्रहालय भव्य आणि कलात्मक अनुभव देतेसंग्रहालयातील मूर्ती इंडोनेशिया, बँकॉक, सिंगापूर, चीन, नेपाळ या देशांहून आणण्यात आल्या आहेत. तसेच पितळ, तांबा, काच, फायबर अशा विविध साहित्यातून तयार केलेल्या मूर्ती येथे पाहायला मिळतात.दुर्बिणीने पाहता येणाऱ्या मूर्तींत मोहरीवर, तिळावर, तांदळावर, पेन्सिलच्या टोकावर केलेले गणेश शिल्प समाविष्ट आहे. खडक, औषधाच्या गोळ्या, फुलांच्या पाकळ्या यांपासून तयार केलेल्या गणपतींमुळे हे ठिकाण अद्वितीय ठरते.



संग्रहालयात भव्य स्वरूपाचे गणेश, विविध खेळ करताना दिसणारे गणवेशातील गणेश, तसेच वाद्य वाजवत असलेले गणेश पाहायला मिळतात. क्रिकेट, हॉकी, कबड्डी, बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेबलटेनिस, शेती काम, वाहन चालवताना अशा दृश्यांचा समावेश आहे.सर्वात आश्चर्यकारक म्हणजे २६ हजार पेन्सिलपासून तयार केलेला गणेश, जो पाहणाऱ्यांना भारावून टाकतो. प्रत्येक मूर्तीवरील बारकाईची कोरीव कला पाहून पर्यटक कौतुक करतात.मोथा गावातील हे संग्रहालय पर्यटकांसाठी केवळ भव्य दृश्य नाही, तर गणपतीबाबतची भक्ती आणि कलात्मकतेचा अनुभव देणारे केंद्र आहे.संग्रहालयाला भेट देणारे लोक फोटोग्राफीसाठीही येथे मोठ्या संख्येने येतात. येथील अद्वितीय मूर्ती आणि कलात्मकतेमुळे मोथा गाव आता नकाशावर एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते.संग्रहालयाच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. विविध सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन येथे होत असल्याने पर्यटकांचे येणे-जाणे सतत वाढत आहे.

# अमरावतीकर वाहतूक कोंडीत त्रस्त; खोडके दाम्पत्यांनी केली अधिकाऱ्यांसोबत पाहणी, नवीन पुलाच्या कामाला लागणार दीड वर्षे विलंब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

शहराची जीवनवाहिनी मानला जाणारा राजकमल-जयस्तंभ चौक मार्गावरील रेल्वे उड्डाणपूल हा अनेक वर्षांपासून जीर्ण अवस्थेत होता. वाहतूक योग्य नसल्याने अखेर हा पूल बंद करण्यात आला. मात्र यामुळे अमरावतीकर अक्षरशः वाहतूक कोंडीत गुदमरू लागले आहेत. शहरी भागातील प्रत्येक रस्ता ठप्प होत असून नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

याच पार्श्वभूमीवर लोकप्रिय आमदार संजय खोडके व आमदार सुलभा खोडके यांनी बुधवारी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, मनपा आयुक्त सोम्या शर्मा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह उड्डाणपुलाची पाहणी केली. सोबतच नागरिकांचा रोष शांत करण्यासाठी पर्यायी मार्गांची चाचपणी करण्यात आली.पाहणीदरम्यान स्पष्ट करण्यात आले की, हा उड्डाणपूल पाडून नव्याने बांधण्यासाठी किमान दीड ते दोन वर्षांचा अवधी लागणार आहे. तोपर्यंत वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी जिल्हा प्रशासन,




पोलीस प्रशासन, मनपा व सार्वजनिक बांधकाम विभाग तात्पुरते उपाय करणार असल्याचे सांगण्यात आले.पण प्रत्यक्षात प्रशासनाची कार्यपद्धती पाहता, हा प्रश्न तातडीने सुटेल याबाबत नागरिकांमध्ये प्रचंड शंका आहे.

**नागरिकांचा संताप उफाळला**

अमरावतीकरांनी या पाहणीवर तीव्र रोष व्यक्त केला आहे.ङ्कनेत्यांची केवळ पाहणी करून काही उपयोग नाही. पुलाचा प्रश्न नवीन नाही, वर्षानुवर्षे हा पूल डोळ्यादोरख्याने जीर्ण होत होता. पण पुढाऱ्यांनी डोळेझाक केली. आता पूल बंद झाल्यावर दाखवायची पाहणी आणि खोटे आश्वासनं. ही नेत्यांची केवळ नौटंकी आहे,ङ्घ अशा कठोर शब्दांत नागरिकांनी आमदार व प्रशासनावर ताशेरे ओढले.गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी या निर्णयाचा नागरिकांना मोठा फटका बसला. गणेश मूर्ती आणण्यासाठी नागरिकांना लांब फेऱ्या माराव्या लागल्या, मिरवणुका विस्कळीत झाल्या. घरगुती बाप्पा आणणेही नागरिकांसाठी डोकेदुखी ठरले.

**साप गेल्यावर काठी अमरावतीत जुना खेळ**

या संपूर्ण प्रकरणावर नागरिकांनी स्पष्ट भूमिका घेतली आहे की, ङ्कसाप गेल्यावर काठी उगारण्याचा प्रकारङ्घ अमरावतीत पुन्हा एकदा घडतोय. पूल बंद केल्यामुळे नागरिकांची दैनंदिन हालअपेष्टा वाढल्या आहेत, व्यवसाय ठप्प झाले आहेत, आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका अडकत आहेत.सामान्य नागरिकांची मागणी आहे की, तातडीने पर्यायी पूल किंवा बायपास उभारण्याचे ठोस नियोजन करावे, अन्यथा अमरावती शहर वाहतूक कोंडीत कायमचे अडकून बसेल. फक्त पाहणी आणि आश्वासनं नकोत; खरे काम तात्काळ सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.आता या पुलावरून आरोप,प्रत्यारोपांच्या फेरी झाडायला सुरवात झाली असल्याचे चित्र ही शहरात पहावयास मिळत आहे.